www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118



■ रायगड किल्ला व परिसर पर्यटन विकासाचे काम...
पान ३ वर....


# दैनिक लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ




■ कुर्ला बेस्ट बस अपघातातील मृतांची संख्या वाढली...
पान ६ वर....

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक १८९ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, बुधवार, ११ डिसेंबर २०२४ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

## थोडक्यात

### घाटकोपर फलक दुर्घटना : आरोपी भावेश भिंडेचा जामीन रद्द करा

मुंबई : घाटकोपर येथील महाकाय फलक दुर्घटना प्रकरणातील कथित मुख्य आरोपी आणि इगो मीडियाचा मालक भावेश भिंडे याला जामीन मंजूर करण्याच्या सत्र न्यायालयाच्या निर्णयाला राज्य सरकारने उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. तसेच, त्याचा जामीन रद्द करण्याची मागणी केली आहे. सरकारने पालिका कंत्राटदार सागर कुंभार याला जामीन मंजूर करण्याच्या निर्णयालाही आव्हान दिले आहे.

### बेस्ट बस अपघात प्रकरणात आरोपीला ११ दिवसांची पोलिस कोठडी



मुंबई - कुर्लामध्ये बेस्टचा भीषण अपघात घडल्यानंतर, राज्यभरातून हळहळ व्यक्त होत आहे. या अपघातात ६ जणांचा मृत्यू, तर ४३ जण गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर भाभा रूग्णालयात उपचार सुरू आहेत. अशातच बेस्ट उपक्रमाकडून समितीची स्थापना करण्यात आली आहे. ११ डिसेंबरला झालेल्या अपघाताची चौकशी करण्यासाठी तसेच नुकसान भरपाईसाठी समिती गठीत करण्यात आली आहे.

यातून अपघातातील मृतांच्या नातेवाईकांना २ लाखांची मदत बेस्टकडून जाहीर करण्यात आली आहे. दरम्यान, याप्रकरणी आरोपीला ११ दिवसांची पोलिस कोठडी देण्यात आली आहे.

### महिला लोकशाही दिन १६ डिसेंबर रोजी

पालघर : समस्याग्रस्त व पिडीत महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी तसेच त्यांच्या हक्कांचे संरक्षण उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने महिलांच्या तक्रारी, अडचणी यांची शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरावर महिला लोकशाही दिन प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी म्हणजेच या महिन्याचा महिला लोकशाही दिन दि. १६ डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, येथे आयोजित करण्यात आला आहे. महिला लोकशाही दिनाचा अर्ज जिल्हाधिकारी यांना उद्देशून असावा. तसेच तालुका महिला लोकशाही दिन टोकन क्र. व तहसिलदारांच्या उत्तराची प्रत अर्जा सोबत जोडण्यात यावी.

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून माजी राज्यपाल एस.एम. कृष्णा यांना श्रद्धांजली



● मुंबई, यश सावंत :

महाराष्ट्राचे माजी राज्यपाल एस.एम. कृष्णा यांच्या निधनाने राजकारण, समाजकारण, शैक्षणिक, न्यायिक क्षेत्रातील दिग्गज, मार्गदर्शक व्यक्तिमत्त्व आपण गमावले आहे, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार आपल्या शोकसंदेशात म्हणतात की, महाराष्ट्राचे माजी राज्यपाल एस.एम. कृष्णा यांना दांडगा राजकीय, प्रशासकीय, शैक्षणिक अनुभव आहे. त्यांनी कर्नाटकचे मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री, राज्यपाल, विधानसभा अध्यक्ष, उपमुख्यमंत्री अशी महत्त्वाची सार्वजनिक पदे भूषविली आहेत. या पदांवरून काम करताना त्यांनी नेहमीच लोकहित जपण्याचा प्रयत्न केला आहे. पायाभूत सुविधांचा विकास, शैक्षणिक गुणवत्तेत वाढ, आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये सुधारणा आदी बाबतीतील त्यांचे कार्य कायम स्मरणात राहील. श्री. एस.एम. कृष्णा यांचे निधन हे त्यांच्या परिवारासाठी मोठा धक्का आहे. हे दुःख पचवण्याची शक्ती त्यांच्या कुटुंबीयांना मिळो, अशी प्रार्थना करतो. एस.एम. कृष्णा यांच्या कुटुंबियांच्या, नातेवाईकांच्या, कार्यकर्त्यांच्या, चाहत्यांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या शोकभावना व्यक्त केल्या आहेत.

# कल्याणमधील दुर्गाडी किल्ल्यावर मंदिरच; जिल्हा व सत्र न्यायालयाचा निर्णय

● कल्याण, विवेक गुंजाळ :

कल्याणमधील ऐतिहासिक दुर्गाडी किल्ल्यावर मंदिर आहे, हा शासनाचा त्यावेळचा निर्णय मान्य करत कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयाचे वरिष्ठ विभागाचे न्यायाधिश ए. एस. लांजेवार यांनी दुर्गाडी किल्ल्यावरील मंदिराचा दावा मान्य केला. हे प्रकरण कल्याण न्यायालयातून वक्फ बोर्डाकडे वर्ग करण्याचा अन्य धर्मियांचा दावा न्यायालयाने फेटाळला, अशी माहिती या प्रकरणातील याचिकाकर्ते आणि हिंदू मंचचे अध्यक्ष दिनेश देशमुख यांनी मंगळवारी माध्यमांना दुर्गाडी किल्ला येथे दिली.



मागील पन्नास वर्षापासून दुर्गाडी किल्ल्यावर मंदिर की मस्जिद हा दोन धर्मियांमधील दावा कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयात सुरू होता. यापूर्वी हा दावा ठाणे जिल्हा न्यायालयात सुरू होता. त्यानंतर हा दावा कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयात वर्ग करण्यात आला होता, असे याचिकाकर्ते दिनेश देशमुख यांनी सांगितले. या दाव्यासंदर्भात माहिती देताना याचिकाकर्ते दिनेश देशमुख यांनी माध्यमांना सांगितले, १९७१ मध्ये ठाणे जिल्हाधिकाऱ्यांनी दुर्गाडी किल्ल्यावर मंदिर असल्याचे जाहीर केले होते. त्यानंतर याठिकाणी मंदिर की मस्जिद असा एक चौकशी अर्ज दाखल करण्यात आला होता. या दाव्यात हिंदू समाजातर्फे ॲड. भाऊसाहेब मोडक यांनी बाजू मांडली. मस्जिदीला खिडक्या नसतात. याठिकाणी मंदिराला खिडक्या आहेत. याठिकाणी मूर्ती ठेवण्यासाठी देवालय (चौथरा) आहे. त्यामुळे ही वास्तू मंदिर आहे, असे तेव्हा शासनाने जाहीर केले होते.

दुर्गाडी किल्ल्यावर मंदिर नसून मस्जिदच आहे, असा अर्ज ठाणे जिल्हा न्यायालयाकडे १९७५-७६ मध्ये दाखल झाला. त्यानंतर दोन वर्ष हा दावा सुरू होता. त्यानंतर हा दावा कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयाकडे वर्ग करण्यात आला. पान २ वर

# डोंबिवलीतील ५८ बेकायदा इमारतींमधील पाणी, वीजपुरवठा खंडित करण्याच्या हालचाली

## उच्च न्यायालयाच्या आदेशावरून कारवाईचे नियोजन

● डोंबिवली, प्रथमेश चव्हाण :



डोंबिवली शहराच्या विविध भागातील ६५ बेकायदा इमारती तोडण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने कल्याण डोंबिवली पालिकेला दिले आहेत. या बेकायदा इमारतींमधील सात इमारती पालिकेने जमीनदोस्त केल्या आहेत. उर्वरित ५८ बेकायदा इमारतींवर तोडकामाची कारवाई करण्यासाठी या इमारतींचा वीज, पाणी पुरवठा खंडित करण्यासाठी प्रभाग साहाय्यक आयुक्तांनी महावितरण, पालिकेच्या पाणी पुरवठा विभागाला पत्र पाठविले आहे.

५८ बेकायदा इमारतींमध्ये रहिवास आहे. या इमारतींमध्ये सुमारे दीड हजारहून अधिक कुटुंबे राहत आहेत. या इमारती रहिवासमुक्त करून देण्याची जबाबदारी उच्च न्यायालयाने पोलिसांवर टाकली आहे. येत्या तीन महिन्याच्या काळात या ५८ बेकायदा इमारती पालिकेला जमीनदोस्त करायच्या आहेत. या इमारती जमीनदोस्त करण्याची कार्यवाही वेळेत व्हावी यासाठी आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड, अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे, अतिक्रमण नियंत्रण उपायुक्त अवधूत तावडे यांच्या स्तरावरून नियोजन केले जात आहे. पालिका प्रभागस्तरावरून ह, ग, ई, आय, जे प्रभागातील साहाय्यक आयुक्तांनी आपल्या हद्दीतील महारेरा प्रकरणातील बेकायदा इमारतींच्या विकासकांना येत्या दहा दिवसात इमारती रिकाम्या करण्याच्या नोटिसा पाठविण्याची कार्यवाही पूर्ण केली आहे. बेकायदा बांधकाम करणाऱ्या विकासकाने स्वत:हून ही इमारत रहिवास मुक्त करून दिली नाहीतर, पोलीस बळाचा वापर करून इमारतीमधील रहिवाशांना घराबाहेर काढून न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे या इमारतींवर कारवाई केली जाईल, असे साहाय्यक आयुक्तांनी ५८ बेकायदा इमारतींच्या विकासकांना कळविले आहे.

या नोटिसांवरून विकासक आणि रहिवाशांमध्ये वादाचे प्रसंग निर्माण झाले आहेत. पान २ वर

# २९ गावांचा वसई विरार महापालिकेत समावेश

## ३१ हजार हरकतींवर जिल्हाधिकारी कार्यालयात सुनावणी

● वसई , सुचिता सोनावणे :



राज्य शासनाने वसई विरार महापालिकेत २९ गावे कायम ठेवण्याच्या निर्णयावर तब्बल ३१ हजार हरकती आणि सूचना आल्या आहेत. त्यात गावे वगळावी यासाठी १९ हजार तर गावे वगळू नये यासाठी ११ हजार हरकती आल्या आहेत. या सर्व हरकती आणि सूचनांवर १६ डिसेंबरपासून जिल्हाधिकारी कार्यालयात सुनावणी होणार आहे. २०११ साली वसई विरार महापालिकेतून २९ गावे वगळण्यात आली होती. शासनाच्या या निर्णयाला वसई विरार महालिकेने आव्हान देत स्थगिती मिळवली होती. तेव्हापासून १३ वर्ष गावे वगळण्याचे प्रकरण उच्च न्यायालयात प्रलंबित होते. मात्र १४ फेब्रुवारी २०२४ रोजी राज्य शासनाने गावे वगळण्याचा २०११ चा निर्णय रद्द केला आणि गावे पुन्हा महापालिकेत समाविष्ट करत असल्याचा नवीन अध्यादेश जाहीर केला होता. गावांचा कायमस्वरूपी महापालिकेत समावेश करण्यात आल्याने या संदर्भातील हरकती आणि सूचना मागविण्यात आल्या होत्या. गावांचा महापालिकेत समावेश केल्यांतर १४ फेब्रुवारी २०२४ ते १४ मार्च २०२४ पर्यंत ३१ हजार ३८९ हरकती आणि सूचना आल्या होत्या. त्यात गावे महापालिकेतून वगळू नयेत यासाठी ११ हजार ५९१ तर वगळण्यात यावीत यासाठी १९ हजार ७९८ अर्ज प्राप्त झाले होते. पान २ वर



## आदिवासी क्षेत्रात ३३ लाख क्विंटल धान खरेदीचे उद्दिष्ट

● नाशिक, सचिन कदम :

महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळमार्फत आधारभूत किंमत योजनेंतर्गत आदिवासी क्षेत्रात यंदाच्या मोसमात ३३ लाख क्विंटल धान खरेदीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. धान खरेदीला सुरुवात करण्यात आली असून शेतकऱ्यांनी एनईएमएल पोर्टलवर आपल्या नजिकचे धान खरेदी केंद्र निवडून नोंदणी करावी, असे आवाहन आदिवासी विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक लीना बनसोड यांनी केले आहे. पान २ वर

# बॅलेटपेपरवर मतदान घेण्याच्या मागणीसाठी लवकरच भारत जोडो यात्रेप्रमाणे मोठे जनआंदोलन उभे करु: नाना पटोले

● मारकडवाडी , विशाल पाटील :



भारताच्या शेजारच्या देशातील लोकशाही संपुष्टात येत असताना भारतात लोकशाही व्यवस्थेला ग्रहण लावण्याचे काम सुरु आहे. लोकशाहीत मतदार हा राजा असतो त्या मतदार राजाच्या मतदानाची चोरी केली जात आहे. यामध्ये ईव्हीएम मशिनबद्दल जनतेच्या मनात शंका आहेत म्हणूनच मारकडवाडीच्या लोकांनी आपले मत कोणाले गेले हे पाहण्यासाठी बॅलेट पेपरवर मतदान घेण्याचा निर्णय घेऊन देशाला दिशा दाखवली आहे. लोकशाहीत मतांचा अधिकार अबाधित रहावा व बॅलेट पेपरवरच मतदान व्हावे या मागणीसाठी लवकरच भारत जोडो यात्रेप्रमाणे मोठे जनआंदोलन उभे केले जाईल व त्याची सुरुवात मारकडवाडीपासून करु, असा निर्धार महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सोलापूर जिल्ह्यातील मारकडवाडीला भेट देऊन गावकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांच्याबरोबर माजी आमदार रामहारी रुपनवर, माजी आमदार व राजीव गांधी पंचायत राज संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे, सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नंदकुमार पवार, सोलापूर शहर काँग्रेसचे अध्यक्ष चेतन नरोटे, प्रा. यशपाल भिंगे यांच्यासह गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावकऱ्यांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, विधानसभा निवडणुकीतील आश्चर्यकारक निकाल पाहून निवडणूक प्रक्रियेवरच शंका निर्माण झाली आहे. निवडणूक आयोगाने मतदानाच्या दिवशी संध्याकाळी ५ वाजता प्रसिद्ध केलेल्या अधिकृत आकडेवारीनुसार ५८.३३ टक्के मतदान झाले होते, त्याच रात्री ११.३० वाजेपर्यंत ६५.२% तर दुस-या दिवशी म्हणजे २१ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजता ६६.०५% मतदान झाल्याचे अधिकृतरित्या जाहीर केले आहे. यात ७६ लाख मतदान कसे वाढले, कोणत्या मतदारसंघात संध्याकाळी ५ वाजल्यानंतर मोठ्या रांगा होत्या त्याचे व्हिडिओ चित्रिकरण सादर करा अशी मागणी निवडणूक आयोगाला पत्र पाठवून केली आहे पण अद्याप त्यांच्याकडून उत्तर मिळालेले नाही. लोकशाही वाचवण्यासाठी मारकडवाडीच्या योद्ध्यांनी सुरु केलेल्या लढाईत काँग्रेस पक्ष गावकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. पान २ वर

# मार्चपासून मेट्रोची धाव वरळीपर्यंतच

● मुंबई, विशाल कारंडे :

‘कुलाबा – वांद्रे – सीप्झ मेट्रो ३’ मार्गिकेतील आरे – बीकेसी दरम्यानचा पहिला टप्पा वाहतूक सेवेत दाखल झाला आहे. बीकेसी – कफ परेड दरम्यानचा दुसरा टप्पा केव्हा वाहतूक सेवेत दाखल होणार याची मुंबईकरांना प्रतीक्षा आहे. मुंबईकरांची ही प्रतीक्षा लवकरच संपणार आहे. मात्र बीकेसी – कफ परेड नव्हे तर बीकेसी – आचार्य अत्रे चौक, वरळी असा टप्पा मार्च २०२५ मध्ये वाहतूक सेवेत दाखल होणार आहे. टप्पा २ अ मध्ये हा टप्पा वाहतूक सेवेत दाखल होणार असून या टप्प्याचे संचलन सुरू झाल्यास मुंबईकरांना आरे – आचार्य अत्रे चौक असा थेट भुयारी प्रवास करता येणार आहे. तर दुसरीकडे आचार्य अत्रे चौक – कफ परेड टप्पा २ ब जून २०२५ मध्ये वाहतूक सेवेत दाखल करण्याचे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे (एमएमआरसी) नियोजन आहे. ही संपूर्ण मार्गिका वाहतूक सेवेत दाखल झाल्यास चांगला प्रतिसाद मिळेल असा दावा एमएमआरसीकडून केला जात आहे. त्यामुळे शक्य तितक्या लवकर बीकेसी – कफ परेड मार्गिकेचे काम पूर्ण करून या मार्गिकेचे संचलन सुरू करण्याचे उद्दीष्ट एमएमआरसीचे आहे. त्यानुसार या मार्गिकेच्या कामाला वेग देण्यात आला असून आतापर्यंत बीकेसी – कफ परेड मार्गिकेचे ८८.१ टक्के काम पूर्ण झाले आहे. दरम्यान, कफ परेडपर्यंतचा टप्पा मार्च २०२५ मध्ये पूर्ण करून मे २०२५ पर्यंत भुयारी मेट्रो कफ परेडपर्यंत धावेल असे सांगण्यात आले होते. पण आता मात्र मार्च २०२५ पर्यंत बीकेसी – आचार्य अत्रे चौक, वरळी असा टप्पा वाहतूक सेवेत दाखल होईल आणि आरे – आचार्य अत्रे चौक अशी भुयारी मेट्रो धावेल. आरे – बीकेसी, बीकेसी – वरळी आणि वरळी – कफ परेड अशा तीन टप्प्यांत भुयारी मेट्रो वाहतूक सेवेत दाखल केली जाईल असे काही महिन्यांपूर्वी एमएमआरसीकडून जाहीर करण्यात आले होते. पान २ वर



### आचार्य अत्रे चौक ते कफ परेड टप्प्यासाठी जूनपर्यंतची प्रतीक्षा

टप्पा ‘२ अ ’चे काम वेगात सुरू असून लवकरच ते पूर्ण होईल. तर मार्च २०२५ मध्ये बीकेसी – आचार्य अत्रे चौक टप्पा ‘२ अ ’ वाहतूक सेवेत दाखल होईल. टप्पा ‘२ अ ’ वाहतूक सेवेत दाखल झाल्यानंत टप्पा ‘२ ब’ चे काम पूर्ण करून हा टप्पा जून २०२५ मध्ये वाहतूक सेवेत दाखल केला जाईल

– अश्विनी भिडे, व्यवस्थापकीय संचालक, एमएमआरसी

# फ्लेमिंगोंच्या आगमनाची प्रतीक्षाच

● नवी मुंबई, भावना जैन :



नवी मुंबई शहराला फ्लेमिंगो सिटी असे संबोधले जाते. येथील डीपीएस तलाव तसेच एनआरआय कॉप्लेक्स पाठीमागील पाणथळ परिसर तसेच नेरुळ सीवूड्स येथील टी एस चाणक्य तलाव येथे मोठ्या प्रमाणात फ्लेमिंगोंचे आगमन होते. यंदा या परदेशी पाहुण्यांचे आगमन लांबणीवर पडले. गेल्या वर्षी नोव्हेंबर २०२३ मध्येच फ्लेमिंगोंचे आगमन झाले होते. परंतू यंदा डिसेंबरचा दुसरा आठवडा उलटला तरी अद्याप नवी मुंबई परिसरात फ्लेमिंगो आगमन झालेले नाही. फ्लेमिंगोंचे आगमन झाल्याचे व्हिडिओ वायरल झाल्याने फ्लेमिंगोंबाबतची उत्सुकता वाढली. नवी मुंबईतील डीपीएस तलाव तसेच नेरुळ एनआरआय तलाव तसेच टी एस चाणक्य तलाव हे फ्लेमिंगोंचे महत्वाचे अधिवास आहेत. दररोज टी. एस चाणक्य तलाव व नेरुळ एनआरआय तलाव येथे लाखो फ्लेमिंगोंचे आगमन या हंगामात होते. नवी मुंबई महापालिका क्षेत्रात असलेल्या पाणथळ क्षेत्रात फ्लेमिंगोना भरपूर खाद्या मिळत असल्याने तेथे त्यांचा वावर मोठ्या प्रमाणात पाहायला मिळतो. गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये फ्लेमिंगोंचे आगमन नवी मुंबई परिसरात पाहायला मिळाले होते. नाव्हेंबर ते अगदी मे अखेरपर्यंत शहरात फ्लेमिंगोंचे दर्शन होत होते. यंदा मात्र जवळजवळ फ्लेमिंगोंचे आगमन १ महिना लांबणीवर पडले आहे. परंतु फ्लेमिंगोंचे आगमन उशीरा झाल्यास त्यांचा येथील रहिवासही उशीरापर्यंत राहतो.

## संपादकीय

# वाळवंटातले वालीहीन!

असद ही ब्याद होती, सीरियाच्या भल्यासाठी त्यांना हाकलणे आवश्यकच होते; पण पुढे काय, याचे उत्तर ना सीरियनांकडे आहे ना पाश्चात्त्यांस त्यात स्वारस्य आहे. या पृथ्वीतलावर सीरियासारखा दुर्दैवी देश नसेल आणि सीरियन्ससारखे दुसरे अभागी नागरिक नसतील. या देशाचा प्रमुख स्वत:च्याच नागरिकांविरोधात रासायनिक अस्त्रे वापरतो, स्वत: अय्याशीत जगत असताना नागरिकांच्या अक्षरश: उद्ध्वस्त आयुष्याकडे काणाडोळा करतो आणि ज्याला आपल्या प्रजेविषयी कसलीही सहानुभूती नसते असा या देशाचा पदच्युत अध्यक्ष बशर अल असद याचा लौकिक. बंडखोरांच्या रेट्यामुळे या असदवर परागंदा होण्याची वेळ आली. सीरियन्ससाठी हा मुक्तीचा क्षण होता आणि एखाद्या निवडणुकीनंतर आपल्याकडे फटाके वाजावेत तशा हवेत बंदुकांच्या फैरी झाडत नागरिकांनी स्वातंत्र्य साजरे केले. या बशर यास देशाचे प्रमुखपद वारशातून मिळाले. याचे तीर्थरूप हफीज अल असद हे जवळपास ३० वर्षे सीरियाचे अध्यक्ष होते. ती त्यांची कमाई होती. गरीब घरातून आलेले हफीज राजकीय चळवळीकडे आकृष्ट झाले आणि बाथ पक्षातून चढत ते अध्यक्षपदापर्यंत पोहोचले. ते २००० साली गेले. त्यानंतर ते पद बशर यांस मिळाले. वास्तविक त्या वेळी ते पद त्यांच्या ज्येष्ठ बंधूकडे जाते. पण त्यांचेही अपघाती निधन झाल्यामुळे बशर यांस संधी मिळाली. वास्तविक त्या वेळी हे बशर अध्यक्षपदासाठी पात्र नव्हते. कारण वय. सीरियन घटनेप्रमाणे या पदासाठी किमान वय ४० हवे. पण बशर हे तेव्हा ३४ वर्षांचे होते. त्यामुळे या बशरभाईंसाठी घटनेत बदल केला गेला आणि अध्यक्षपदी त्यांची 'नियुक्ती' झाली. म्हणजे सुमारे पाच दशके या देशावर असद घराण्याचा अंमल आहे. तो आता संपला. अर्धशतकाहून अधिक काळच्या असद राजवटीत लक्षावधींचे प्राण घेणाऱ्या, तितक्याच जणांस तुरुंगात डांबणाऱ्या बशर यांच्या विरोधात उठाव झाला आणि त्यांना पत्नीसह दमास्कसमधून पळून जावे लागले. बांगलादेश, श्रीलंका आदी देशांत जे झाले त्याचीच ही अरब पुनरावृत्ती.

ती ज्याच्यामुळे झाली ते बशर अल असद हे नेते म्हणून इतके नतद्रष्ट आहेत की मानवी संस्कृती विकासाच्या केंद्रस्थानी असलेल्या अत्यंत ऐतिहासिक अशा वारशाचे आपण रक्षणकर्ते आहोत ही जाणीव त्यांस कधीही नव्हती. वास्तविक ते पाश्चात्त्य विद्याविभूषित. नेत्रशल्यचिकित्सक. त्यामुळे ते आपल्या वडिलांप्रमाणे असणार नाहीत, सुधारणावादी असतील अशी अपेक्षा होती. ती पहिल्याच वर्षी धुळीस मिळाली. राजकीय विरोधकांचे २००१ सालचे आंदोलन त्यांनी थोरल्या असदांच्या शैलीत चिरडले. त्या वेळी इतका रक्तपात झाला की दमास्कसमध्ये रक्ताचे शब्दश: पाट वाहिले आणि त्यातील रक्तधारा आठवडाभर 'ओल्या' होत्या. खरे तर दमास्कस हे इसवी सनाच्याही आधीपासूनचे एक महानगर. तुर्की-चलित ऑटोमन साम्राज्याच्या काळातही दमास्कसची भूमिका महत्त्वाची होती आणि नंतर ब्रिटिशांच्या हाती हा सारा परिसर गेल्यानंतरही हे शहर त्या राजकारणाच्या केंद्रस्थानी राहिले. 'लॉरेन्स ऑफ अरेबिया' म्हणून ओळखले जातात ते टी. ई. लॉरेन्स यांचाही संबंध या शहराच्या जडणघडणीत होता. इराक, जॉर्डन, इस्रायल आदींस प्रागऐतिहासिक वारसा आहे. त्यांच्याइतकाच सीरियाही समृद्ध. यहुदी, अरब, कुर्द, अलवाईट्स, ख्रिश्चनांतील विविध अल्पसंख्य समुदाय इत्यादी अठरापगड नाही तरी डझनभर विविध धार्मिक/ वांशिक नागरिक या देशात राहतात. खुद्द असद हे अलवाईट्स पंथाचे. ही इस्लामच्या शिया शाखेतील एक फांदी. सुन्नींच्या तुलनेत शिया तसेही कट्टर नसतात. त्यात अलवाईट्स अधिकच सहिष्णू. त्यामुळेही असेल सीरिया हा अन्य अरब शेजाऱ्यांच्या तुलनेत नेहमीच प्रगतशील राहिला. हे एका अर्थी इराकच्या सद्दाम हुसेन याच्या राजवटीसारखे म्हणायचे. जगासाठी क्रूरकर्मा इत्यादी असलेला सद्दाम हा प्रागतिक होता आणि त्याच्या राजवटीत महिलांस बुरखा/ हिजाब आदींची सक्ती नव्हती. महिलांस त्या काळी शिक्षण सहज घेता येत असे. असद यांची राजवटही अशीच होती. सहिष्णू आणि धर्मनिरपेक्ष.

त्या देशाचा बाज आता तसा राहील किंवा काय हा प्रश्न. या असद यांनी स्वत:च्या राजवटीस विरोध करणाऱ्यांविरोधात इतकी दडपशाही केली की त्यांच्यासाठी देशातील शत्रूंची संख्या सातत्याने वाढत गेली. पंथीय जवळिकीमुळे त्यांना शियांचे प्राबल्य असलेल्या इराणचा कायम पाठिंबा राहिला आणि इराण अमेरिकाविरोधी भूमिका घेत असल्याने रशियाही असद यांचा तारणहार राहिला. या दोघांच्या लष्करी/संरक्षण साह्याच्या जोरावर असद यांनी आपल्या देशात अनन्वित अत्याचार केले. परिणामी त्यांच्या विरोधात देशाच्या सर्व बाजूंनी बंडखोर सेना आकारास येत गेल्या. त्यांनाही अर्थातच परदेशी फूस होती. यातील सर्वात लक्षणीय 'एचटीएस' नावाने ओळखली जाणारी 'हयात तहरीर अल-शाम' ही संघटना. ही सुन्नी. त्यामुळे परिसरातील सुन्नी देश, संघटना यांच्याकडून तीस आर्थिक आणि अन्यही साहाय्य दिले जात असून असद यांच्याविरोधी संघर्षात ती आघाडीवर होती.

अबू मोहम्मद अल जोलानी हा या संघटनेचा प्रमुख. गेल्या दशकभरापासून अधिक काळ जोलानी आणि त्याची संघटना असद यांच्या विरोधात उठावाच्या प्रयत्नात होते. त्याने प्रयत्नही बराच केला आणि सीरियाच्या सीमेवरील काही प्रांतांत त्याचे प्राबल्यही तयार झाले. तथापि त्याची आगेकूच असद हे इराण आणि रशियाच्या मदतीने रोखू शकले. हे या वेळी त्यांना शक्य झाले नाही कारण मुळातच पश्चिम आशियाचा प्रदेश कमालीच्या अस्थिरतेतून जात असून इराण, त्या देशाच्या मदतीने उभी असलेली हेझबोल्ला ही दहशतवादी संघटना यांचे साहाय्य असद यांस मिळेनासे झाले आणि युक्रेन युद्धात अडकलेले असल्याने रशियाचे अध्यक्ष पुतिन यांसही सीरियाच्या आणि त्यातही असद यांच्या दुखण्यात लक्ष घालणे अशक्य झाले. तेव्हा जोलानी याच्या धडकेपुढे असद यांच्या नेतृत्वाखालील अधिकृत फौजांनी पांढरे निशाण फडकावले. असद यांच्यासमोर देशत्यागाखेरीज पर्याय राहिला नाही. तथापि सीरियाची खरी अडचण पुढेच आहे. असद ही ब्याद होती आणि सीरियाच्या भल्यासाठी त्यांना हाकलून लावणे आवश्यकच होते; हे खरे. पण पुढे काय, हा त्यापेक्षाही गंभीर प्रश्न. कारण देश चालवण्याइतके कौशल्य ना जोलानी याच्याकडे आहे ना तितका पाठिंबा त्याला आहे. त्यास तूर्त तुर्कीचे साह्य आहे. पण ज्या क्षणी कुर्दिश बंडखोरांसही तुर्कीच्या कारभारात काही स्थान मिळेल त्या क्षणी तुर्कीचा पाठिंबा राहील का, हा प्रश्न. शिवाय जोलानी एकेकाळी 'अल कईदा'शी संलग्न होता.

# लोकशाहीच्या रक्षणार्थ छत्रपतींचं स्मरण गरजेचं

आपल्या भारतीय लोकशाहीने देशातल्या प्रत्येक नागरिकाला मतदानाचा अधिकार दिला आहे. या अधिकारानुसार प्रत्येक मतदार आपल्या पसंतीच्या उमेदवाराला मतदान करत असतो.हा अधिकार एवढ्यापर्यंतच मर्यादित नसून मतदाराने दिलेलं मत त्याच उमेदवाराला मिळतं तेव्हा ती प्रक्रिया खऱ्या अर्थाने पूर्ण होते.

मात्र महाराष्ट्र राज्य विधानसभेच्या २०२४ च्या जाहीर झालेल्या निकालाने या प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह उभं केलं आहे? सत्ताधारी पक्षाने मतदान यंत्रांमध्ये नियोजनपूर्वक घोटाळा करून हा विजय मिळवल्याचा आरोप देशभरातले निष्पक्ष पत्रकार,राजकीय विश्लेषक आणि सर्वसामान्य जनता करत आहे.निवडणूक प्रक्रियेदरम्यान काही ठिकाणी मिळालेले राऊटर,मतदारांच्या संख्येपेक्षा झालेलं जास्त मतदान,काही ठिकाणी अनधिकृत वाहनांमधून झालेली मतदानयंत्रांची वाहतूक, उमेदवाराला स्वतःच्या गावात किंवा प्रभागात एकही मत न मिळणे,एकच जिल्ह्यातल्या पराभूत उमेदवारांना जवळजवळ सारखीच मतं मिळणे अशा घटना या आरोपांना पुष्टी देत आहेत. समाजमाध्यमातूनसुद्धा ठिकठिकाणी याचा समाचार घेतला जात आहे.खरंतर निवडणूक जाहीर झाल्यापासून लोकांच्या मनातली निकालाबद्दलची जनभावना व्यक्त होत असते.उदाहरणच द्यायचं झालं तर २०१४च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी जनमत भाजप आणि मित्रपक्षांच्या बाजूने होतं.तसं ते ठीकठिकाणी व्यक्तही होत होतं. साहजिकच त्यानुसार भाजप आणि मित्रपक्षांना बहुमत मिळालं.मात्र हे बहुमत मिळताच स्वतःला मित्रपक्ष म्हणवून घेणाऱ्या भाजपने वंदनीय बाळासाहेबांच्या पश्चात झालेल्या विधानसभा निवडणुकीपूर्वीच शिवसेनेबरोबरची युती तोडली. तरीही स्वबळावर निवडून आलेल्या आपल्या ६४ आमदारांचा भक्कम पाठिंबा देवेंद्र फडणवीस यांना मुख्यमंत्री होण्यासाठी उद्धवजींनी खुल्या मनाने दिला. मात्र त्याच देवेंद्र फडणवीसानी आणि भाजपाने शिवसेनेला उपमुख्यमंत्रीपद नाकारलं.त्यानंतर २०१९ च्या निवडणुकीमधे शिवसेनेला दिलेला मुख्यमंत्रीपदाचा शब्द मोडणे,२०२२ ला महाविकास आघाडीच्या मुख्यमंत्रीपदावरून उद्धव ठाकरेंना पायउतार होण्यास भाग पाडणे,केंद्रीय सत्ता आणि स्वायत्त संस्थांचा दुरुपयोग करून शिवसेना आणि राष्ट्रवादी पक्षात मोठी फूट घडवून त्या पक्षांची नावं आणि चिन्ह आपली राजकीय राक्षसी महत्वकांक्षा पूर्ण करण्यासाठी बेकायदेशीरपणे दुसऱ्याच्या स्वाधीन करणे, त्या त्या राज्यातल्या अस्मितेचं प्रतिनिधित्व करणाऱ्या प्रादेशिक पक्षांबरोबर युती करून हळूहळू त्या पक्षांनाच संपवून टाकणे याबरोबरच महाराष्ट्राच्या हक्काचे उद्योगधंदे गुजरातमधे पाठवणे अशा सर्व घटनांबरोबरच लोकप्रतिनिधी आणि राजकीय नेत्यांच्या दिवसाढवळया झालेल्या हत्या,पोलीस ठाण्यामध्ये लोकप्रतिनिधीने केलेला गोळीबार,बदलापूरसारखी प्रकरणं, मराठा आंदोलकांवर झालेला लाठीमार, महाराष्ट्राच्या इतिहासात प्रथमच वारकऱ्यांवर झालेला लाठीमार अशा कायदा सुव्यवस्था ढासळल्याचा प्रत्यय देणाऱ्या सर्व घटनांचा एकत्रित परिणाम म्हणून निवडणुकीचं जनमत महाविकास आघाडीच्या बाजूने होतं. अवघ्या चार-पाच महिन्यापूर्वी झालेल्या लोकसभेच्या निवडणुक निकालनेसुद्धा याचा प्रत्यय दिला होता.या निवडणुकीमधे ३३ जागा मिळवणाऱ्या महाआघाडीला विधानसभा निवडणुकीत लोकसभेच्या गणिताचा विचार केला तर किमान दीडशेपेक्षा जास्त जागा मिळवण्याचा ठोस अंदाज व्यक्त केला जात होता आणि वस्तुस्थितीसुद्धा तशीच होती. मात्र असं असताना तीन पक्षांच्या आघाडीला मिळून जेमतेम पन्नास जागा मिळत असतील आणि त्यातही उल्लेखनीय बाब म्हणजे कोणत्याही एका पक्षाला विरोधी पक्षनेता पद मिळवण्यासाठीच्या किमान २९ जागासुद्धा मिळू नये याचा थेट संबंध काँग्रेसमुक्त भारत या घोषणेसह 'देशात फक्त भाजप हा एकच पक्ष राहील'या मुजोर वक्तव्याशी येतो तसाच तो जनमानसातून व्यक्त होत असलेल्या निवडणूक यंत्रणेच्या फेरफाराच्या चर्चांशीसुद्धा जोडला जातो. खरंतर निवडणुकीमध्ये कोण जिंकलं?किंवा कोण हरलं? यापेक्षा सत्तेच्या जोरावर निवडणूक प्रक्रियेमध्ये फेरफार घडवून आपल्या इच्छेनुसार निकाल लावून घेतले जात असतील तर लोकशाहीचा कणा असलेल्या मतदारांशी आणि एकूणच लोकशाहीशी केलेली ही प्रतारणा नव्हे काय? या सगळयावर कहर म्हणजे निवडणुक प्रक्रियेत झालेल्या घोटाळयाची सत्यता पटवून देण्यासाठी सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस विधानसभा मतदारसंघाच्या मारकडवाडी गावातल्या ग्रामस्थांनी त्यांच्या गावात झालेल्या मतदान प्रक्रियेवरच शंका उपस्थित करून गावात पुन्हा कागदी मतपत्रिकेवर मतदान घेण्याचा निर्णय घेतला.विशेष म्हणजे निवडून आलेल्या उमेदवाराच्या समर्थकांचा हा प्रयत्न होता. अर्थात एका गावासाठी पुन्हा होणाऱ्या या प्रायोगिक मतदानाचा निकाल काहीही लागला तरी अगोदर जाहीर झालेल्या मुळ निकालावर त्याचा कोणताही परिणाम होणार नव्हता.पण तरीही शासनाने पोलिसी बळाचा वापर करून गावात होणाऱ्या या मतप्रयोगावर बंदी घातली. याचं कारण हा प्रयोग यशस्वी झाला असता तर महाराष्ट्रातल्या प्रत्येक गावातल्या मतदारांनी अशा प्रयोगाची मागणी केली असती आणि त्यातून खरी वस्तुस्थिती जनतेसमोर आली असती.म्हणूनच सरकारने गावकऱ्यांचा हा प्रयोग दडपला का?अशी शंका सर्वत्र व्यक्त होत आहे. सत्तेच्या जोरावर हाणून पाडलेला मारकडवाडीतल्या मतदानाचा प्रयोग हा केवळ त्या गावकऱ्यांचा अपमान नसून समस्त महाराष्ट्रातील मतदारांसह लोकशाहीची झालेली शोकांतिका आहे. अशा पद्धतीने स्वतःच्या राजकीय महत्वकांक्षेपोटी अतिरेकी बळाचा वापर करून महाराष्ट्राचा आवाज दाबल्याचा आनंद व्यक्त होत असेल तर सतराव्या शतकातल्या स्वाभिमानी महाराष्ट्रधर्माच्या जाज्वल्य इतिहासाचं कृतज्ञतापूर्वक स्मरण होणं गरजेचं आहे.

**मिलिंद मधुकर जाधव**

# प्रत्येकाच्या हक्कांच्या रक्षणामुळे लोकशाही बळकट - राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

## राजभवन येथे आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिनानिमित्त कार्यक्रम



**मुंबई (विशाल कारंडे) :** लोकशाहीमध्ये प्रत्येक व्यक्तीच्या हक्कांचे रक्षण होणे गरजेचे आहे. आपण या तत्वाचे पालन करित असल्यानेच आपली लोकशाही बळकट असल्याचे प्रतिपादन राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात केले. शाळा आणि महाविद्यालयांच्या अभ्यासक्रमांमध्ये मानवी हक्कांबाबतचे शिक्षण समाविष्ट करून युवकांमध्ये सहानुभूती आणि न्यायाची संस्कृती निर्माण करणे गरजेचे असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

राज्यपालांच्या प्रमुख उपस्थितीत राजभवन येथे राज्य मानवी हक्क आयोगामार्फत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुंबई उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश नरेश पाटील, आयोगाचे अध्यक्ष न्या. के.के. तातेड, आयोगाचे सदस्य एम. ए. सईद, संजय कुमार यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन म्हणाले, अल्पसंख्याक, अनुसूचित जाती, जमाती, महिला, मुले, तृतीयपंथी आणि दिव्यांग व्यक्तींचे हक्क हे आपल्या मानवाधिकार अजेंड्याच्या अग्रस्थानी राहिले पाहिजेत. प्रत्येक गट समाजासाठी महत्त्वपूर्ण योगदान देतो आणि त्यांना समानतेचे आणि आदराचे वातावरण मिळणे आवश्यक आहे.

हवामान बदल व अन्य नैसर्गिक घटक हेदेखील शेतकऱ्यांसमोरील आव्हानांचे व्यापक स्वरूप असल्याचे राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी नमूद केले. शेतकऱ्यांसाठी समुपदेशन सेवा महत्त्वाचा टप्पा ठरू शकतो, असे त्यांनी सांगितले. मानवी हक्क आयोगाचे कार्य दुर्बल घटकांपर्यंत न्याय पोहोचविण्यात उपयुक्त ठरले असल्याचेही ते म्हणाले.

मानवी हक्क दिनाचा यावर्षीचा 'आपले हक्क, आपले भविष्य, आत्ता' हा विषय अत्यंत दूरदृष्टीपूर्ण असून मानवाधिकारांच्या आव्हानांवर तज्ज्ञांच्या व्याख्यानांचे आयोजन केल्याबद्दल राज्यपालांनी आयोगाचे कौतुक केले. राज्य मानवी आयोग स्थापन झाल्यापासून, अशा असंख्य व्यक्ती आणि गटांसाठी तो आशेचा किरण ठरला असल्याचे सांगून राज्यभरातील व्यक्तींच्या सन्मान आणि हक्कांचे रक्षण करण्याचे राज्य मानवाधिकार आयोगाचे प्रयत्न प्रशंसनीय असल्याचेही राज्यपालांनी सांगितले. प्रत्येक नागरिकाला आत्मसन्मानाने जगता येईल अशा संधी निर्माण करणे, पर्यावरणाचे रक्षण करणे, जागतिक हवामान बदलांना सामोरे जाणे याला आपण सर्वोच्च प्राधान्य द्यावे लागेल, असेही राज्यपाल राधाकृष्णन यांनी यावेळी नमूद केले. मान्यवरांच्या हस्ते यावेळी आयोगाच्या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. न्या. तातेड यांनी प्रारंभी आयोगाच्या कार्याची माहिती दिली. तर, न्या. पाटील यांनी प्रत्येकाने आपल्या हक्कांचे जतन करतानाच इतरांच्या हक्कांचीही जाणीव ठेवण्याचे आवाहन केले. यावेळी बांधावरील प्रयोगशाळा, आहार हेच औषध, महिला आणि मुलांची देह विक्रीबाबत जनजागृती, दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरीक यांच्यासाठी कार्य करणाऱ्या संस्थांच्या माहितीवर तसेच आदिवासी भागातील समस्या आणि त्यांच्या हक्काबाबत जनजागृती करणारी दालने उभारण्यात आली होती, त्यांची राज्यपाल राधाकृष्णन यांनी पाहणी केली.

## पान १ वरून...

### बॅलेटपेपरवर मतदान घेण्याच्या...

आता राज्यातील इतर गावांमधूनही ग्रामसभा ठराव करून बॅलेट पेपरवर मदतदान घेण्याची मागणी करत आहेत. मारकडवाडीतून सुरु झालेला हा लढा आता राज्यभर पसरु लागला आहे. सांगली जिल्ह्यातील कोळेवाडी, रायगड जिल्ह्यातील माणगाव यासह राज्यातील अनेक गावांमध्ये आंदोलने उभी रहात आहेत. ही लढाई आता मारकडवाडीची राहिलेली नसून देशव्यापी आंदोलन बनत आहे. मारकडवाडीच्या लढाईची सर्व माहिती लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना दिली असून भारत जोडो यात्रेप्रमाणे लवकरच एक मोठी यात्रा काढण्यावर विचार सुरु आहे, असेही नाना पटोले यांनी सांगितले.

मारकडवाडीतील लोकांनी केवळ मॉक पोलिंग घेण्याचा निर्णय घेतला तर सरकार घाबरले व पोलीसांच्या मदतीने हा आवाज दडपण्याचा प्रयत्न केला. १४४ कलम लावले, अनेकांवर गुन्हे दाखल केले आहेत. गावकऱ्यांवर दाखल केले गुन्हे तातडीने मागे घ्यावेत यासाठी राज्याच्या मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासनही नाना पटोले यांनी दिले आहे.

### कल्याणमधील दुर्गाडी...

त्यावेळी हा वक्फ आहे. हा दावा कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयातून वक्फ बोर्डाकडे वर्ग करावा, अशी मागणी अन्य धर्मियांनी केली. ही मागणी फेटाळत न्यायालयाने दुर्गाडी किल्ला येथे मंदिरच आहे, असे सांगत शासनाचा यापूर्वीचा निर्णय मान्य केला, असे याचिकाकर्ते दिनेश देशमुख यांनी सांगितले. याप्रकरणात हिंदू समाजातर्फे ॲड. भिकाजी साळवी, ॲड. सुरेश पटवर्धन, ॲड. जयेश साळवी, सरकार पक्षातर्फे ॲड. सचिन कुलकर्णी यांनी काम पाहिले.

या प्रकरणात विजय साळवी, आ. विश्वनाथ भोईर, रवींद्र कपोते, अरविंद मोरे, छाया वाघमारे , पराग तेली, सुरेंद्र भालेकर, विजय काटकर, अमोल जव्हेरी, राजन चौधरी, अनिल तिवारी, विजया पोटे हे याचिकाकर्ते होते. दावेदार होते. या निर्णयाला अन्य धर्मियांनी उच्च न्यायालयात स्थगिती मिळविण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत.

हिंदुत्वाचा विजय मागील पन्नास वर्षापासून हा दावा सुरू होता. दुर्गाडी किल्ल्यावर आपलाच दावा असल्याचा दावा अन्य धर्मिय करत होते. न्यायालयाच्या निर्णयामुळे किल्ल्यावर मंदिरच असल्याचे स्पष्ट झाले. आणि हा हिंदुत्व, सत्याचा विजय आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शामुळे पावन झालेली ही भूमी आहे. या किल्ल्यावर शिवाजी महाराज येऊन गेले आहेत. हा किल्ला आणि येथील मंदिरासाठी हिंदू समाजाचे कल्याणमधील अग्रणी मंदिराच्या हक्कासाठी लढत होते. न्यायदेवतेने आपली बाजू मान्य केली. हिंदुत्व व सत्याचा विजय झाला आहे, असे माजी नगरसेवक रवी पाटील यांनी सांगितले. शिवकाळापासून दुर्गाडी किल्ल्याला इतिहास आहे. हिंदवी स्वराज्याचे पहिले आरमार कल्याणमध्ये सुरू झाले. पूर्वीपासून याठिकाणी हिंदू समाजाचा हक्क होता. तो न्यायालयाच्या निर्णयामुळे आता मान्य झाला, असे कल्याणच्या इतिहासाचे अभ्यासक डॉ. श्रीनिवास साठे यांनी सांगितले.

### डोंबिवलीतील ५८ बेकायदा...

५८ बेकायदा इमारतींचा वीज, पाणी पुरवठा खंडित केल्यानंतर या इमारतींमधील रहिवाशांच्या सेवासुविधा बंद होतील. पोलिसांनी या बेकायदा इमारती रहिवास मुक्त करून पालिकेच्या स्वाधीन केल्यानंतर पालिकेकडून या इमारतींवर तोडकामाची कारवाई सुरू केली जाणार आहे. पोलिसांनी इमारती रहिवासमुक्त करण्याची कार्यवाही करण्यासाठी पालिका उपायुक्त स्तरावरून पोलिसांशी पत्रव्यवहार केला जात आहे. प्रभाग साहाय्यक आयुक्तांनी स्थानिक महावितरण अभियंत्यांना पत्रे पाठवून आपल्या प्रभागातील महारेरा प्रकरणातील बेकायदा इमारतींचा वीज पुरवठा खंडित करण्याची मागणी केली आहे. पालिकेच्या पाणी पुरवठा विभागाला संबंधित इमारतींचा पाणी पुरवठा खंडित करण्याचे कळविले आहे. आय प्रभागाचे साहाय्यक आयुक्त भारत पवार, ग प्रभागाचे साहाय्यक आयुक्त संजयकुमार कुमावत, ह प्रभागाचे साहाय्यक आयुक्त राजेश सावंत यांनी नोटिसा पाठविण्याची कार्यवाही पूर्ण केली आहे.

आपल्या प्रभागातील महारेरा प्रकरणातील बेकायदा इमारती रिकाम्या करण्यासाठी नोटिसा पाठविल्या आहेत. वीज, पाणी पुरवठा खंडित करण्यासाठी संबंधित कार्यालयांना पत्रे दिली आहेत. ही कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर वरिष्ठांच्या आदेशाप्रमाणे तोडकामाची कारवाई सुरू केली जाईल. चंद्रकांत जगताप, साहाय्यक आयुक्त, ई प्रभाग.

### २९ गावांचा वसई विरार...

या हरकती आणि सूचनांवर आता पालघर जिल्हाधिकारी कार्यालयात सुनावणी घेतली जाणार आहे. ही सुनावणी १६ डिसेंबर ते २० डिसेंबरपर्यंत घेतली जाणार आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीमुळे या हरकतींवरवरील सुनावणी लांबणीवर पडली होती.

हरकती आणि सुचनांच्या सुनावणीसाठी विशेष पथकांची नियुक्ती करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. तालुकास्तरीय तहसिलदारांच्या पथकात तलाठी, कोतवाल, पोलीस पाटील यांचा समावेश करण्यात आला असून हे पथक अर्जदारांना नोटीसचे वाटप करणे, सुनावणी पथकाला मदत करण्याचे काम करणार आहे. वसई विरार महापालिकेकडून १५ पथक नियुक्त करण्यात येणार असून त्यांचे प्रमुख त्यात एक अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त यांचा समावेश आहे. अर्जाची छानणी करणे, सुनावणी नोटीस बजावणे, सुनावणी घेणे आणि अंतिम अहवाल तयार करण्याची जबाबदारी या पथकावर असणार आहे. ३० डिसेंबर २०२४ पर्यत सुनावणी घेऊन निर्णय दिला जाणार आहे.

### आदिवासी क्षेत्रात ३३ लाख...

राज्यातील आदिवासी भागातील शेतकऱ्यांनी पिकविलेल्या धानाची आदिवासी विकास महामंडळाकडून किमान आधारभूत किंमतीत खरेदी केली जाते. २०२४-२५ या वर्षासाठी केंद्र शासनाने २३०० रुपये प्रतिक्विंटल असा दर निश्चित केला आहे. गेल्या वर्षी २१८३ रुपये प्रति क्विंटल असा दर होता. महामंडळामार्फत राज्यातील सहा केंद्रांमध्ये धान खरेदी केली जाणार असून यामध्ये गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर, पालघर, ठाणे, रायगड, नाशिक, पुणे, अहिल्यानगर या जिल्ह्यांचा समावेश आहे. धान खरेदीत पारदर्शकता येण्यासाठी यंदाच्या मोसमात महामंडळाचे अधिकारी, कर्मचारी यांनी थेट बांधावर जाऊन पडताळणी केली आहे. यामध्ये प्रादेशिक अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष क्षेत्र व लागवडीखालील क्षेत्र, याची पाहणी करून शेतकऱ्यांचे समुपदेशन करत ई पीक पाहणी करण्यास शेतकर्यांना मदत केली आहे.

### मार्चपासून मेट्रोची धाव...

यात बदल करून आता आरे – बीकेसी आणि बीकेसी – कफ परेड असा टप्पा वाहतूक सेवेत दाखल करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. आता मात्र यात पुन्हा बदल करण्यात आला आहे. त्यानुसार आता टप्पा २ अ अंतर्गत बीकेसी – आचार्य अत्रे टप्पा, तर टप्पा २ ब अंतर्गत आचार्य अत्रे – कफ परेड टप्पा वाहतूक सेवेत दाखल होणार आहे.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# रायगड किल्ला व परिसर पर्यटन विकासाचे काम उत्तम दर्जाचे व जलदगतीने व्हावे यासाठी जिल्हा प्रशासनाने प्राधिकरणाशी समन्वय राखून काम करावे - खासदार छत्रपती संभाजी राजे भोसले

**नवी मुंबई (भावना जैन) :-** रायगड किल्ला व परिसर पर्यटन विकासाचे काम उत्तम दर्जाचे व जलदगतीने व्हावे यासाठी जिल्हा प्रशासनाने प्राधिकरणाशी समन्वय राखून काम करावे. यासाठी शासनाव्दारे मंजूर झालेला निधी १०० टक्के खर्च होईल यासाठी योग्य नियोजन करावे. अशा सूचना रायगड किल्ला व परिसर विकास पर्यटन आराखडा प्राधिकरणाचे अध्यक्ष खासदार छत्रपती संभाजी राजे भोसले यांनी केले. खासदार छत्रपती संभाजी राजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली कोकण भवन येथील आयुक्त कार्यालयाच्या मुख्य दालनात आज रायगड किल्ला व परिसर विकास पर्यटन आराखडा प्राधिकरणाची आढावा बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीस कोकण विभागाचे महसूल आयुक्त डॉ. राजेश देशमूख, रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी किशन जावळे, उपआयुक्त(नियोजन) प्रमोद केंबावी, रायगडचे उप जिल्हाधिकारी डॉ. रविंद्र शेळके, महाडचे उपविभागीय अधिकारी ज्ञानोबा बानापूरे, रायगड पाणी संवर्धन विभागाचे अधिक्षक अभियंता संजय शिंदे, रोहाचे सहाय्यक वनसंरक्षक रोहित चोबे, पेण-रायगड विद्यूत विभागाचे कार्यकारी अभियंता श्रीमती संजिवनी कट्टी तसेच प्राधिकारणाशी संबंधित अधिकारी व कर्मचारी



उपस्थित होते.

रायगड किल्ला संवर्धन व किल्ल्याच्या आजूबाजूचा परिसर पर्यटनाच्या दृष्टीने विकसीत करण्यासाठी शासनाद्वारे निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यानूसार आराखडा तयार करण्यात आला असून आराखडयातील कामांची अंदाजपत्रके तयार करुन निविदा प्रक्रीय पूर्ण झाल्या आहेत. यावेळी रायगड किल्ला व परिसर विकास पर्यटनाची कामे उत्तम दर्जाची आणि जलद गतीने होण्यासाठी उपसमिती गठीत करण्याच्या सुचना आराखडा प्राधिकरणाचे अध्यक्ष खासदर छत्रपती संभाजी राजे भोसले



यांनी संबंधितांना दिल्या. या बैठकीत किल्ल्यांचा इतिहास जिवंत करुन दाखविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर करुन "शिवसृष्टी" निर्माण करण्यात येणार असल्याबाबतचे सादरीकरण करण्यात आले. यात रायगड किल्ल्यावर प्राचिन वस्तूंचे संवर्धन, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन पर्यटकांना मनोरंजनासह गड-किल्ल्यांची माहिती उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. किल्ल्यावरील सर्व वस्तूंचे माहिती संग्रहण करण्यात येणार आहे.

रायगड किल्यावरील चित्त दरवाजा, नाना दरवाजा, खुबल्दा बुर्ज, महादरवाजा आदींचे संवर्धन व जिर्णोद्धार करणे, तसेच पर्यटक व शिवप्रेमींना रायगडावर पोहचण्यासाठी मजबूत पायवाटा निर्माण करणे, स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी आदी महत्वाच्या सोयी उपलब्ध करून देणे, जलसंवर्धन करणे याबाबींचा समावेश आहे. याशिवाय पाचाड येथील राजमाता जिजाऊ समाधी व जिजामाता वाडा यांच्या संवर्धन व जिर्णोद्धाराचे कार्य तसेच याठिकाणी पर्यटकांसाठी आवश्यक सोयी उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावीत आहे. प्रगत संगणन विकास केंद्र (सीडॅक) व्दारे आधूनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन पर्यटकांच्या मार्गदर्शनासाठी विविध ॲप तयार करण्यात येणार आहेत. तसेच व्हिज्यूअल तंत्रज्ञानाचा वापर करुन पर्यटकांना गड-किल्ले आणि इतिहासातील माहिती देण्यासाठी विविध ठिकाणी दालने तयार करण्यात येणार आहेत. याचे प्रारुप स्वरुपाचे सादरीकरण प्रगत संगणन विकास केंद्र (सीडॅक) च्या अधिकाऱ्याव्दारे याबैठकीत करण्यात आले. या बैठकीत रायगड जलसंधारण विभागाव्दारे रायगड किल्ला, शिवसृष्टी आणि परिसरातील गावांसाठी भवीष्यात ३० वर्षे पूरेल या दृष्टीकोनातून पाण्याचे नियोजन करण्यासाठी आराखडा तयार करण्यात आला आहे. त्या आराखड्याचे सादरीकरण यावेळी करण्यात आले.

## कोकण विभागीय लोकशाही दिनी आज ०५ अर्ज प्राप्त

**नवी मुंबई -** कोंकण विभागीय लोकशाही दिन कोंकण भवनमध्ये तहसिदार (सामान्य प्रशासन) श्री. महेंद्र बेलदार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी नागरिकांनी आपल्या तक्रारी मांडल्या. त्यांच्या समस्या जाणून प्रकरणे उचित कार्यवाहीसाठी संबंधित कार्यालयांकडे पाठविण्यात आली. यावेळी विभागीय स्तरावरील विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. कोंकण विभागीय स्तरावर आतापर्यंत झालेल्या लोकशाही दिन कार्यक्रमात एकूण प्रलंबित अर्जांची संख्या १२ असून आज आलेल्या अर्जांची संख्या ०५ आहे, असे एकूण प्राप्त अर्ज १७ होते त्यापैकी ०७ अर्ज निकाली काढण्यात आला आहे. त्यापैकी १० अर्ज प्रलंबित आहेत.

## टोकावडे पोलीस ठाण्यात मानवी हक्क दिनाची जनजागृती!



**मुरबाड -** १० डिसेंबर हा दिवस मानवी हक्क दिन म्हणून राज्यात कायमस्वरुपी साजरा केला जातो. या वर्षी मानवाधिकारांच्या सार्वत्रिक घोषणा आहे. मानवी हक्क संरक्षण कायदा १९९३ मधील कलम १२ अन्वये मानवी हक्काबाबत जनजागृती करणे हा राज्य मानवी हक्क आयोगाचा महत्वपूर्ण अविभाज्य भाग आहे. सदरील कायादद्यांतर्गत समाजतील तळागाळापर्यंत जनतेला मानवी हक्काचे ज्ञान माहित होणे व त्याबद्दल जनजागृती करीता टोकावडे पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनकर चकोर यांनी हद्दीतील पोलीस पाटील यांना पोलीस ठाण्यात बोलवुन सदर बाबत माहिती देण्यात आली. तसेच महात्मा गांधी विद्यालय व कला, विज्ञान व्यवसाय कनिष्ठ महाविद्यालय धसई येथे विद्यार्थ्यांना मानवी हक्क दिवस याबाबत सविस्तर प्रबोधन करून विद्यार्थ्यांना माहिती दिली.

## सशस्त्र सेना ध्वज दिन निधी संकलनास ठाणे जिल्ह्यात प्रारंभ सशस्त्र सेना ध्वजदिन निधीसाठी सर्वांनी सक्रिय योगदान द्यावे - उपजिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील

**ठाणे (विशाल पाटील ) :-** भारतीय लष्करातील सैनिक हे अहोरात्र आपल्या सीमेवर रक्षण करत असतात. त्यांच्या प्रती कृतज्ञता दाखविण्यासाठी सशस्त्र सेना ध्वजदिन निधीची संकल्पना अंमलात आणली आहे. या निधीच्या माध्यमातून सैनिक/माजी सैनिक, त्यांच्या कुटुंबियांना मदत केली जाते. त्यामुळे शासकीय कार्यालय, जबाबदार नागरिकांनी ध्वज दिन निधीसाठी सढळ हाताने मदत करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) हरिश्चंद्र पाटील यांनी आज येथे केले. सशस्त्र सेना ध्वजदिन २०२४ निधी संकलनाचा ठाणे जिल्ह्यातील शुभारंभ कार्यक्रम आज ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात पार पडला. त्यावेळी उपजिल्हाधिकारी श्री. पाटील बोलत होते. कॅप्टन वाय. के. राव, नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे सहाय्यक पोलीस आयुक्त किशोर गायके, नौदलातील लेफ्टनंट अभिषेक कुमार सिंह, ठाणे तहसीलदार किशोर मराठे, जिल्हा




सैनिक कल्याण अधिकारी ठाणे/पालघर मेजर (नि.) प्रांजळ जाधव यांच्यासह विविध कार्यालयांचे कार्यालय प्रमुख उपस्थित होते.

उपजिल्हाधिकारी श्री. पाटील म्हणाले की, गेल्या वर्षी ठाणे जिल्ह्यासाठी ध्वजदिन निधी संकलनाचे दिलेले उद्दिष्ट पूर्ण केले आहे. यासाठी जिल्ह्यातील प्रशासकीय कार्यालये, दानशूर व्यक्ति, संस्थांनी हातभार लावला आहे. या वर्षीही ठाणे जिल्ह्याला दिलेले उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी सर्वांनी मोठ्या प्रमाणावर योगदान द्यावे. या निधीच्या माध्यमातून माजी सैनिक, शहिद सैनिकांच्या वीरपत्नी, वीरमाता-पिता तसेच पाल्यांना आर्थिक मदत दिली जाते. या निधीतून सहाय्यासाठी माजी सैनिक, वीरपत्नी, वीरमाता-पिता तसेच माजी सैनिकांच्या पाल्यांनी अर्ज करावेत. भारताच्या संरक्षणासाठी ज्यांनी आपले प्राण अर्पण केले अशा जवानांच्या कुटुंबियांच्या जीवनातील अडीअडचणी दूर करुन त्यांचे जीवन सुसह्य करण्यासाठी तसेच युध्दात अपंगत्व आलेल्या आणि सशस्त्र दलातून निवृत्त झालेल्या जवानांच्या पुनर्वसनाच्या विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी या निधीचा विनीयोग केला जातो. आपल्या सैनिकांचे ऋण अल्पस्वरुपात फेडण्याची संधी जनतेला ध्वजदिनांच्या निमित्ताने प्राप्त होत असते.

## जीवनदीप मध्ये पार पडल्या अंतर महाविद्यालयीन पॉवरलिफ्टिंग टूर्नामेंट

**कल्याण (आकाश कांबळे) :** युनिव्हर्सिटी ऑफ मुंबई ठाणे झोन क्रिडा समिती आणि जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय गोवेली येथे इंटर कॉलेजिएट पॉवरलिफ्टिंग टूर्नामेंट चे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. पुरुष व महिला या दोन गटात पावर लिफ्टिंग टूर्नामेंटचे आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यक्रमाला उपस्थित प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले महाराष्ट्र पावर लिफ्टिंग असोसिएशन सचिव संजय सरदेसाई, ठाणे झोन सचिव राहुल अकुल,




यज्ञेश्वर बागराव, ठाणे पावर लिफ्टिंग असोसिएशन अध्यक्ष देवदत्त भोईर, पॉवरलिफ्टिंग स्पर्धा मुंबई विद्यापीठ निवड समिती प्रा. नवनाथ गायकर, व प्रा. सुरेश चेडे, मुंबई विद्यापीठ प्रतिनिधी प्रमोद बोराडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती या स्पर्धेसाठी एकूण ३४० स्पर्धक सहभागी झाले होते. यामध्ये महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी केली उल्लेखनीय कामगिरी केली. विशेष म्हणजे मुले आणि मुली या दोन्ही संघाचे सांघिक विजेतपद गोवेली महाविद्यालयास मिळाले. या कार्यक्रमासाठी उपस्थित असलेले संजय सरदेसाई, राहुल अकुल, यज्ञेश्वर बागराव, नितीन कुडाळकर, साहिल उत्तेकर, संस्थेचे अध्यक्ष रविंद्र घोडविंदे, संस्थेच्या संचालिका स्मिता घोडविंदे, संचालक प्रशांत घोडविंदे, प्राचार्य डॉ. के. बी. कोरे. उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे. क्रीडा विभाग प्रमुख मोहनीश देशमुख या स्पर्धेसाठी यांचा विशेष सहकार्य लाभलं.

## केडीएमसी क्षेत्रातील हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी विशेष स्वच्छता मोहिमेचे नियोजन

**कल्याण (विवेक गुंजाळ) :** कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील एअर क्वालीटी इंडेक्स सुधारण्यासाठी, रस्ते संपूर्ण स्वच्छता करुन धुळमुक्त करणे, या हेतुने महानगरपालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड़ यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड व घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उप आयुक्त अतुल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ५ डिसेंबर पासून महापालिका क्षेत्रातील सर्व मुख्य रस्ते रात्रपाळीत स्वच्छ करण्यात येत आहेत.

प्रभागक्षेत्र स्तरावर सुरु असलेल्या रात्रपाळीत कामाची गुणवत्ता तपासण्यासाठी अ प्रभाग क्षेत्रातील मोहने गेट, ब प्रभाग क्षेत्रातील प्रेम ऑटो ते व्हरटेक्स व खडकपाडा ते झुलेलाल चौक, ग प्रभाग क्षेत्रातील इंदिरा गांधी चौक ते गावदेवी मंदिर परिसर, मलंगरोड या ठिकाणी महापालिका अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड व घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उप आयुक्त अतुल पाटील, सहा.आयुक्त प्रिती गाडे यांच्या मार्फत दि. ६ व ७ डिसेंबर या दिवशी रस्ते सफाई दरम्यान भेट देवून प्रत्यक्ष कामाची पाहणी करण्यात आलेली असून, कार्यवाही दरम्यान येणाऱ्या अडचणींबाबत संबंधीत स्वच्छता अधिकारी, स्वच्छता निरीक्षक व इतर कर्मचारी यांना मार्गदर्शन करण्यात आले तसेच कामाची गुणवत्ता वाढविणेबाबत सुचना देण्यात आल्या.

## प्रशिक अधिकारी कर्मचारी संस्थेमार्फत आरोग्य शिबिराचे यशस्वी आयोजन

**ठाणे (रोहित जैसवाल) :** प्रशिक सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी संस्था (रजि.) महाराष्ट्र राज्य व नवयुग सिध्दार्थ क्रीडा मंडळ, अशोकनगर, वालधुनी, कल्याण (पूर्व) यांच्या सहकार्याने नुकतेच कर्मवीर दादासाहेब गायकवाड सभागृह, अशोक नगर वालधुनी कल्याण येथे आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या आरोग्य शिबिरात जवळपास १२५ ते १४० व्यक्तींनी सहभाग नोंदवून आपली आरोग्य तपासणी करून घेतली. यामध्ये रक्तदाब, मधुमेह, डोळे तपासणी, त्वचारोग व सर्वसाधारण आजार असलेल्या व्यक्तींची तपासणी करण्यात आली.

या आरोग्य शिबिरात अपोलो हॉस्पिटलचे आरोग्य पथकातील श्री.मनोज गुप्ता यांच्यासह डॉ.रेखा गायकवाड, डॉ.शतानवानजी हे



कार्यरत होते. जायंट ग्रुप – जायंट्स वेल्फेअर फाऊंडेशन, डोंबिवली युनिट १ चे डॉ.विकास जोशी व त्यांचे आरोग्य पथक यांनीही सहभाग नोंदविला. त्याचप्रमाणे भैरव सेवा समिती, भिवंडी यांचे पथकही सामील होते. तसेच डॉ.अशोक लोंढे व डॉ.शशिकांत ननावरे यांच्या पथकाने सहभाग नोंदवून लाभार्थ्यांची सर्वसाधारण तपासणी केली तर डॉ.ननावरे आणि डॉ.रवींद्र जाधव व त्यांच्या डॉ.सुरेखा जाधव यांनी रुग्णांची तपासणी करून औषधांचे वाटपही केले. या शिबिरात सर्व वैद्यकीय अधिकारी यांनी विनामूल्य आपला वेळ व सेवा प्रदान केली.


तत्पूर्वी दि. २४ नोव्हेंबर २०२४ रोजी संविधान दिनानिमित्त भारतीय राज्यघटनेच्या उद्देशिकेचे वाचन संस्थेचे अध्यक्ष आयु. यशवंतराव गायकवाड यांनी केले. त्यास उपस्थित सर्व जनसमुदयाने एका स्वरात प्रतिसाद दिला. छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ, नवी मुंबई, पनवेल येथील संविधान अभ्यासक आयु, प्रा.बाबूराव बनसोडे यांनी उपस्थित जनसमुदयास भारतीय राज्यघटनेचे महत्त्व पटवून दिले.

प्रशिक संस्थेचे पदाधिकारी कार्याध्यक्ष बी. डी. जाधव, उपाध्यक्ष यशवंतराव भालेराव, अशोक दुधसागरे, कोषाध्यक्ष शांताराम गायकवाड, सहसचिव विजय थुले, पी.डी निकुंभ, सुधाकर जाधव, ज्येष्ठ सदस्य एस. डी. मोरे, ॲड.लभाणे आणि सदस्यांच्या उपस्थितीमुळे कार्यकम यशस्वी झाला, असे प्रशिक अधिकारी-कर्मचारी संस्थेचे सचिव रंगनाथ गरुड यांनी कळविले आहे.

## बदलापुरात सिलेंडरचा स्फोट, एक जखमी

**बदलापूर (गणेश बागडे) :** बदलापूर पश्चिमेचा मांजर्ली भाग मंगळवारी सकाळी सिलेंडर स्फोटाने हादरला. मांजर्लीच्या म्हात्रे चौकात एका हातगाडीमध्ये असलेल्या सिलेंडरचा अचानक स्फोट झाला. यात शेजारी साफसफाई करणारा कामगार जखमी झाला. या स्फोटाची तीव्रता इतकी होती की एक किलोमीटरपर्यंतच्या इमारतींपर्यंत धक्का जाणवला. तर येथील नामदेव प्लाझा इमारतीच्या अनेक घरांच्या काचा फुटल्या. हा चौक सर्वाधिक वर्दळीचा चौक आहे. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

बदलापूर पश्चिम येथील मांजर्ली भागात म्हात्रे चौक वर्दळीचा चौक म्हणून ओळखला जातो. या चौकात नामदेव प्लाझा नावाची इमारत आहे. या इमारतीच्या मोकळया परिसरात



सकाळी पावणे दहाच्या सुमारास नीरज साहा (२२) साफसफाई करत होता. इमारतीच्या समोरील मोकळया जागेतील कचरा आणि पालापाचोळा गोळा केल्यानंतर त्याने तो पेटवला. याच परिसरात अनेक टपऱ्या आणि खाद्यपदार्थाचे स्टॉल आहेत. यातील एक हातगाडी शेजारीच उभी होती. कचरा पेटवल्यानंतर काही क्षणात या हातगाडीचा स्फोट झाला. या हातगाडीत एक सिलेंडर असल्याची माहिती प्रत्यक्षदर्शिनी दिली आहे. ही हातगाडी नेमकी कोणाची याची माहिती कळू शकली नाही. मात्र या स्फोटात नीरज साहा जखमी झाला आहे. त्याला तात्काळ शेजारच्या खाजगी दवाखान्यात प्रथमोपचारासाठी पाठवण्यात आले. नंतर त्याला ग्रामीण रुग्णालयात हलवण्यात आले.

अग्निशमन दलाच्या जवानांनी येथे असलेल्या टपऱ्या आणि आसपासच्या भागात पाणी मारले. या स्फोटाने नामदेव प्लाझा या इमारतीतील अनेक घरांच्या काचा फुटल्या आहेत. सुदैवाने या स्फोटात कोणतीही जीवित हानी झाली नाही. त्यात सकाळच्या सुमारास स्पोर्ट झाल्याने अनेक जण वाचले. या चौकात गेल्या काही वर्षात अनेक टपऱ्या आणि खाद्यपदार्थांच्या हातगाड्या उभ्या राहू लागल्या आहेत. येथे उघड्यावर गॅस सिलेंडरच्या खाद्यपदार्थ तयार केले जातात. याच भागात दवाखाने, इमारती, अनेक दुकाने आहेत. सायंकाळी स्फोट झाला असता तर मोठी जीवितहानी झाली असती अशी भीती येथील रहिवाशांनी व्यक्त केली आहे. या स्फोटानंतर अशा बेकायदा टपऱ्या आणि खाद्यपदार्थांच्या दुकानांवर वेळीच कारवाई करावी, अशी मागणी होते आहे. थोड्याशा पैशांसाठी अशा हातगाड्या उभा करण्यास परवानगी देत असल्याचा आरोप केला जातो आहे.

# दादा देवमाणूस, माझं घर ९ महिन्यांत बांधून देण्याचं आश्वासन

बिग बॉस मराठीच्या पाचव्या सीझनची ट्रॉफी बारमतीचा रांगडा गडी झापुक झुपूक स्टार सूरज चव्हाणनं उंचावली. अवघ्या महाराष्ट्रानं सूरजवर भरभरुन प्रेम केलं आणि त्याला बिग बॉसच्या पर्वाचा विजेता केलं. त्यानंतर सूरज संपूरण राज्यात चर्चेत होता. आपल्याच मतदारसंघातल्या सूरजनं नाव कमावल्याची बातमी उपमुख्यमंत्री अजित पवारांपर्यंत पोहोचली आणि अजित पवारांनी सूरजची भेट घेतली. त्यावेळ सूरजला घर बांधून देण्याचं आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवारांनी दिलं होतं. अशातच आता बिग बॉस फेम सूरज चव्हाणनं मंत्रालयात जाऊन अजित पवारांची भेट घेतली. त्यावेळी पुढच्या ९ महिन्यांत सूरजचं घर पूर्ण होईल, असं आश्वासन अजित पवारांनी त्याला दिल्याची माहिती मिळत आहे.

सूरजनं मंत्रालयात जाऊन अजित पवारांची भेट घेतली. यावेळी अजित पवार यांनी सूरज चव्हाण यांच्या घराची देखील अपडेट घेतली. पुढील ९ महिन्यात सूरज यांच घर पूर्ण होईल असं आश्वासन देखील यावेळी अजित पवार यांनी अभिनेता सूरज चव्हाणला दिलं. अजित पवारांची भेट घेतल्यानंतर सूरज चव्हाणनं माध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी तो म्हणाला की, "अजितदादा बोलतात ते काम करतातच, देवमाणूस आहेत दादा..." पुढे बोलताना सूरज म्हणाला की, अजितदादांना माझ्याकडून खूपखूप शुभेच्छा... मी त्यांना भेटण्यासाठी आलो. मलाच भेटायचं होतं दादांना.



कधी एकदा दादांची भेट घेतोय असं झालं होतं. माझ्या घराचं काम सध्या सुरू आहे. अजितदादा बोलतात ते काम करतातच, देवमाणूस आहेत दादा..."

"दादांचा शब्द आहे, पूर्ण तर करणारच आणि होणारच... आज अजितदादांना शुभेच्छा देण्यासाठी आलो होतो. माझी अनेक मोठी कामं सुरू आहेत. आता झापुक झूपुक पिक्चर लवकरच तुम्हालाटीव्हीवर दिसेल.", असंही सूरज चव्हाण म्हणाला.

### सूरजचं घर कधी बांधून पूर्ण होणार?

दरम्यान, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांनी बिग बॉसचा विजेता सूरज चव्हाणला घर बांधून देण्याचा शब्द दिला होता. त्यानुसार, सध्या सूरजच्या घराचं काम सुरू आहे. पुढच्या ९ महिन्यांत त्याच्या घराचं काम पूर्ण होण्याचं आश्वासन अजित पवारांनी त्याला दिलं आहे. सूरज चव्हाण हा बारामतीतील मोढवे गावचा रहिवासी आहे. सूरज चव्हाण बिग बॉसच्या घरात जाण्यापूर्वी रील स्टार आणि गायक होता. सूरज घर बांधून त्याला 'बिग बॉस'चं नाव देणार आहे. सूरजच्या घराचं स्वप्न लवकरच पूर्ण होणार आहे.

### 'झापुक झुपुक' सूरजचा आगामी चित्रपट

सूरज चव्हाणचा 'झापुक झुपुक' चित्रपट लवकरच रिलीज होणार आहे. स्वतः सूरजनं यासंदर्भात माहिती दिली. सूरज चव्हाणनं अजितदादांची भेट घेतली. त्यावेळी त्यानं माध्यमांशी संवाद साधला, तेव्हा सूरज म्हणाला की, 'झापुक झुपुक' लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. सूरज चव्हाण बिग बॉस जिंकल्यावर केदार शिंदेंनी त्याला घेऊन 'झापुक झुपुक' सिनेमा काढणार अशी घोषणा केली होती. तोच सिनेमा लवकरच प्रेक्षकांच्या भेटीसाठी येणार असल्याची माहिती सूरज चव्हाणनं दिली आहे.

# 'पुष्पा २'मधील अल्लू अर्जुनला आवाज देणाऱ्या श्रेयस तळपदेची खंत?

दाक्षिणात्य सुपरस्टार अल्लू अर्जुनचा 'पुष्पा २: द रुल' हा चित्रपट सध्या बॉक्स ऑफिसवर ब्लॉकबस्टर ठरतोय. गेल्या चार दिवसांत या चित्रपटाने जगभरात कमाईचा तब्बल ८०० कोटी रुपयांचा टप्पा पार केला आहे. मूळ तेलुगू भाषेतील या चित्रपटाचं इतरही काही भाषांमध्ये डबिंग झालंय. त्यापैकी हिंदी भाषेत अल्लू अर्जुनच्या 'पुष्पाराज' या भूमिकेला मराठमोळा अभिनेता श्रेयस तळपदेनं आवाज दिला आहे. 'पुष्पा'च्या पहिल्या भागासाठीही श्रेयसनेच डबिंग केलं होतं. आता सीक्वेलला प्रेक्षकांकडून मिळणारा जबरदस्त प्रतिसाह पाहून त्याने आनंद व्यक्त केला आहे. मात्र त्याचसोबत त्याने एक खंतसुद्धा बोलून दाखवली आहे.





"पुष्पा २ हा चित्रपट थिएटरमध्ये प्रदर्शित झाल्यापासून मला दररोज फोन आणि डीएम (डायरेक्ट मेसेज) येत आहेत. मी खूप खुश आहे आणि मला खरंच निर्मात्यांचे आभार मानायचे आहेत. या ब्लॉकबस्टर चित्रपटाचा एक भाग बनण्याची संधी मला दिल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. प्रेक्षकांकडून मिळणारा प्रतिसाद पाहून मी भारावलोय."

श्रेयसने त्याच्या आतापर्यंतच्या करिअरमध्ये बऱ्याच दमदार चित्रपटांमध्ये काम केलंय. मात्र 'पुष्पा'मुळे जगभरात ओळख मिळाल्याचं त्याने मान्य केलं. याविषयी तो पुढे म्हणाला, "मी माझ्या करिअरमध्ये इतके चित्रपट केले आहेत. इक्बाल, डोर, ओम शांती ओम, वेलकम टू सज्जनपूर, गोलमाल ३, हाऊसफुल २.. पण तरीही या सगळ्यात पुष्पाच अग्रस्थानी आहे. त्यामुळे हा असा पहिला चित्रपट आहे ज्याने मला केवळ देशभरातच नाही तर जगभरात ओळख मिळवून दिली आहे. हिंदी भाषिक प्रेक्षकांना ठाऊक आहे की पुष्पा आणि पुष्पा २ साठी मी डबिंग केली आहे. अशा चित्रपटानंतर जी लोकप्रियता किंवा ओळख मिळते, ते अभूतपूर्व आहे."

यावेळी श्रेयसने अल्लू अर्जुनच्या भूमिकेसाठी परफेक्ट डबिंग करण्यामागचं गुपितही सांगितलं. "मी जेव्हा त्या भूमिकेसाठी डबिंग करतो, तेव्हा मी स्वत:च ती भूमिका पडद्यावर साकारत असल्याची कल्पना करतो. मला माझ्या करिअरमध्ये आतापर्यंत अशी भूमिका मिळाली नाही आणि भविष्यातही मला मिळेल की नाही हे माहीत नाही. पण जेव्हा मी पुष्पा राजसाठी डबिंग करतो, तेव्हा मी स्वत:च त्या भूमिकेत असल्याची कल्पना करतो. दमदार डॉयलॉगबाजीसह पॉवरफुल सीन्स करत असल्याची कल्पना करतो. यामुळेच पडद्यावर तो आवाज ऐकताना अधिक प्रभावी वाटतो", असं श्रेयस म्हणाला.

# रितेशने थेट अभिषेकचे पायच धरले

गेल्या काही महिन्यांपासून अभिनेता अभिषेक बच्चन आणि ऐश्वर्या राय यांच्या घटस्फोटाच्या जोरदार चर्चा आहेत. मात्र त्यावर दोघांनी अद्याप कोणतीच थेट प्रतिक्रिया दिली नाही. या चर्चांदरम्यान आता अभिषेक आणि ऐश्वर्याचं वैवाहिक आयुष्य पुन्हा एकदा प्रकाशझोतात आलं आहे. यामागचं कारण म्हणजे अभिषेकला नुकत्याच एका कार्यक्रमात विचारण्यात आलेला प्रश्न. त्याने रितेश देशमुखच्या 'केस तो बनता ही है' या शोमध्ये हजेरी लावली होती. यावेळी रितेशने त्याला ऐश्वर्यासोबत दुसऱ्या बाळाच्या प्लॅनिंगबद्दल प्रश्न विचारला. हा प्रश्न ऐकताच अभिषेक गालातल्या गालात हसू लागला.





या शोमध्ये रितेशने आधी बच्चन कुटुंबातील नावांबद्दल प्रश्न विचारला. "अमिताभजी, ऐश्वर्या, आराध्या आणि तू अभिषेक. या सर्व नावांची सुरुवात अ या अक्षराने होते. मग जया आंटी आणि श्वेता यांचीच नावं अशी वेगळी का", असा सवाल रितेशने अभिषेकला केला. त्यावर अभिषेक हसत म्हणाला, "हा प्रश्न तुला त्यांनाच विचारावा लागेल. पण माझ्या मते आमच्या घरात ही प्रथाच झाली आहे. अभिषेक, आराध्या.." त्याने आपलं म्हणणं पूर्ण करण्याआधीच रितेश थांबवत पुढे म्हणतो, "आराध्यानंतर?" तेव्हा अभिषेक उत्तर देतो, "नाही, आता पुढची पिढी येईल तेव्हा पाहुयात ना."

अभिषेकचं उत्तर ऐकल्यानंतर रितेश त्याला दुसऱ्या बाळाच्या प्लॅनिंगबद्दल प्रश्न विचारतो. हा प्रश्न ऐकल्यानंतर अभिषेक गालातल्या गालातच हसू लागतो. तरीही हास्यावर नियंत्रण आणून तो रितेशला म्हणतो, "वयाचा विचार कर जरा, रितेश. मी तुझ्यापेक्षा मोठा आहे." हे ऐकल्यानंतर रितेश लगेचच अभिषेकच्या पाया पडू लागतो. या दोघांमधील हा मजेशीर संवाद सध्या चांगलाच चर्चेत आला आहे. अभिषेक आणि ऐश्वर्याने २००७ मध्ये लग्न केलं. त्यांची मुलगी आराध्या नुकतीच १३ वर्षांची झाली आहे.


# 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' मधील कलाकारांचं नवं नाटक लवकरच रंगभूमीवर


छोट्या पडद्यावरील लोकप्रिय कार्यक्रम 'महाराष्ट्राची हास्यजत्रा'चं नवं पर्व नुकतंच सुरू झालं. परदेशवारीनंतर हास्यजत्रेतील अवलीय कलाकार प्रेक्षकांना खळखळून हसवण्याचं काम करत आहेत. आता हास्यजत्रेतील कलाकारांचं नवं नाटक लवकरच रंगभूमीवर येत आहे. यासंदर्भात कलाकारांनी नुकतीच सोशल मीडियावर पोस्ट शेअर केली आहे. हास्यजत्रा'मधील कलाकारांच्या नव्या नाटकाचं नावं 'थेट तुमच्या घरातून' असं आहे. या नव्या नाटकात अभिनेता प्रसाद खांडेकर, शिवाली परब, ओंकार राऊत, भक्ती देसाई, प्रथमेश शिवलकर आणि नम्रता संभेराव पाहायला मिळणार आहेत. 'थेट तुमच्या घरातून' या नाटकाच्या लेखन, दिग्दर्शन आणि निर्मितीची धुरा प्रसाद खांडेकर सांभाळणार आहे. तसंच महत्त्वाचं म्हणजे या नाटकाच्या माध्यमातून शिवाली परब मराठी नाट्यसृष्टीत पाऊल ठेवत आहे. २१ डिसेंबरपासून हे नवं नाटक पाहायला मिळणार आहे. पुढे प्रसाद खांडेकरने लिहिलं की, प्रजाकार या माझ्या नवीन निर्मिती संस्थेच्या माध्यमातून सोहम प्रॉडक्शन आणि गोट्या सावंत यांच्या व्ही आर प्रॉडक्शनच्या मदतीने 'थेट तुमच्या घरातून' या माझ्या नवीन नाटकाची निर्मिती करतोय.

# "डोळ्यातून पाणी आलं...", आदिनाथ कोठारेचे 'पाणी' चित्रपटासाठी कौतुक करत मंजिरी ओक म्हणाल्या, "ही तुझी पहिली फिल्म ..."

आदिनाथ कोठारे दिग्दर्शित 'पाणी' हा चित्रपट काही दिवसांपूर्वी प्रेक्षकांच्या भेटीला आला. हनुमंत केंद्रे यांच्या संघर्षावर 'पाणी' चित्रपट आधारित आहे. प्रदर्शित होण्याआधीपासूनच या चित्रपटाची मोठी चर्चा होताना दिसली होती. अनेकांनी या चित्रपटाचे कौतुक केले होते. आता मंजिरी ओक(Manjiri Oak) यांनी एक खास पोस्ट लिहित आदिनाथ कोठारेचे कौतुक केले आहे.

मंजिरी ओक यांनी पाणी चित्रपटातील एक सीन सोशल मीडियावर शेअर करत लिहिले, "सगळयात आधी मला ही फिल्म बघायला उशीर झाला त्यासाठी आदिनाथ खूप सॉरी. आदिनाथ काय बोलू ? ही तुझी पहिली फिल्म कशी असू शकते ? तू खोटं बोलतोयस. अप्रतिम. फिल्म विषयी बोलयाला माझ्याकडे काहीही शब्द नाहीत. एकच सांगते ज्या क्षणी नागदरवाडीत विहिरीला पाणी लागलं, त्याक्षणी माझ्या आणि मला खात्री आहे की अनेकांच्या डोळ्यातून पाणी आलं आणि तुझ्या घेतलेल्या कष्टांचं चीज झालं. हनुमंत केंद्रे यांच्या जिद्दीला, कष्टांना आणि त्यांच्या व सुवर्णा ताईंच्या प्रेमाला सलाम आहे. तुला खूप घट्ट मिठी आणि मनापासून





धन्यवाद की या विषयाची आम्हाला एक सुंदर अशी गोष्ट सांगितलीस. तुझं खूप खूप खूप कौतुक", असे म्हणत मंजिरी ओक यांनी आदिनाथ कोठारेचे कौतुक केले आहे. याबरोबरच चाहत्यांना हा चित्रपट पाहण्याचे आवाहन केले आहे.

मंजिरी ओक यांच्या पोस्टवर आदिनाथ कोठारेने, "मंजू, थँक्यू सो मच", असे म्हणत हार्ट इमोजी शेअर केल्या आहेत. याबरोबरच अनेक प्रेक्षकांनीदेखील मंजिरी ओक यांच्या पोस्टवर कमेंट करत चित्रपट उत्तम असल्याचे म्हटले आहे. एका नेटकऱ्याने लिहिले, "मंजिरी ताई बरोबर आहे.फिल्म बद्दल बोलायला शब्दच नाहीत. आमच्या नांदेड जिल्ह्यातील एका गावातील सामान्य माणसाचा संघर्ष आदिनाथ कोठारे सरांनी सर्वांसमोर मांडला. बघून खुप भारी वाटलं. चित्रपट पाहताना पुढे काय होईल ही आतुरता कायम असते. पण इतकी सुंदर चित्रपट लोकप्रिय का होत नाही, असा कधी कधी प्रश्न मनाला पडतो", इतर अनेक चित्रपट छान असल्याचे म्हटले आहे.

मंजिरी ओक व प्रसाद ओक हे प्रेक्षकांचे लाडके जोडपे आहे. ते सोशल मीडियावर विनोदी रीलच्या माध्यमातून प्रेक्षकांचे मनोरंजन करताना दिसतात. आता मंजिरी ओक यांनी शेअर केलेली पोस्ट प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेताना दिसत आहे.

दरम्यान, 'पाणी' चित्रपटात आदिनाथ कोठारे, रुचा वैद्य, सुबोध भावे, विकास पांडुरंग पाटील, रजित कपूर, नितीन दीक्षित, सचिन गोस्वामी, किशोर कदम, श्रीपाद जोशी हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत दिसले आहेत. या चित्रपटाची निर्मिती धुरा प्रियांका चोप्रा, डॉ. मधू चोप्रा, नेहा बडजात्या यांनी केली आहे. नुकताच हा चित्रपट ॲमेझॉन प्राइमवर प्रदर्शित झाला आहे.



# अभिनेत्री हेमल इंगळे लवकरच अडकणार विवाहबंधनात

मराठी मनोरंजनविश्वात सध्या लग्नाचे वारे वाहत आहेत. एकामागोमाग एक बरेच कलाकार मंडळी लग्न करताना दिसत आहेत. अलिकडेच अभिनेत्री रेश्मा शिंदे, 'बिग बॉस मराठी' फेम निखिल राजेशिर्के तसेच अभिषेक गावकर हे कलाकार लग्नबंधनात अडकले. त्यातच आता लवकरच मराठी कलाविश्वातील आणखी एक लोकप्रिय अभिनेत्री बोहल्यावर चढणार आहे. या अभिनेत्री म्हणजे हेमल इंगळे. अगदी काही महिन्यांपूर्वीच हेमल इंगळेचा साखरपुडा पार पडला. त्यानंतर तिच्या बॅचरल पार्टीचीही नेटकऱ्यांमध्ये जोरदार चर्चा रंगली. अशातच आता अभिनेत्रीच्या केळवणाचे फोटो समोर आले आहेत.

हेमल इंगळेने सोशल मीडियावर तिच्या केळवणाचे फोटो शेअर करत चाहत्यांना सुखद धक्का दिला आहे. मुळची कोल्हापूरची असलेल्या हेमल इंगळेने 'आस'मधून कलाविश्वात पदार्पण केलं होतं. अभिनय बेर्डेसोबत 'अशी ही आशिकी' या चित्रपटात ती झळकली होती. या चित्रपटामुळे ती घराघरात लोकप्रिय झाली. अलिकडेच ती 'नवरा माझा नवसाचा २' या चित्रपटात झळकली होती.

हेमल इंगळेने सोशल मीडियावर केळवणाचे फोटो शेअर करत कॅप्शनमध्ये लिहलंय की, "Kelvan szn has been going strong". यावरून अभिनेत्रीच्या घरी लग्नापूर्वीच्या विधींना सुरूवात झाल्याचं कळतंय. दरम्यान, हेमल इंगळेच्या होणाऱ्या नवऱ्याचे नाव रोनक आहे. अभिनेत्रीने केळवणासाठी खास निळ्या रंगाचा ड्रेस आणि गळ्यात छानसा नेकलेस घातला आहे. हेमल इंगळेने शेअर केलेल्या फोटोवर सध्या नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला आहे.

## राशी भविष्य




**मेष** – आवडत्या माणसांसोबत वेळ चांगला जाईल. प्रकृतीची काळजी घ्यावी. व्यवहारात हिशोब नीट करा. महत्त्वाच्या वस्तू सांभाळा.

**वृषभ** – नोकरीत सर्व प्रकारचे सहकार्य मिळेल. तुम्हाला कौटुंबिक आणि आर्थिक बाबतीत यश मिळेल. कल्पनाशक्तीला चालना मिळेल.

**मिथुन** – राजकारणाच्या क्षेत्रातील प्रयत्नांना अपेक्षित यश मिळेल. सुख शांतीचा अनुभव घ्याल. सर्वांची मर्जी राखणे सोपे नसेल.

**कर्क** – प्रिय व्यक्तीची भेट झाल्याने मन प्रसन्न होईल. सांस्कृतिक कामात सहभागी होण्याची संधी मिळेल. आपले विरोधक शांत होतील.

**सिंह** – नोकरीत नम्रपणे बोला. आरोग्याच्या बाबतीत अडचण येऊ शकते. कार्यक्षेत्रातील प्रयत्नांना यश मिळेल. नवीन ओळख होईल.

**कन्या** – बिघडलेली कामे पूर्ण होतील. कर्ज प्रकरणात यश मिळेल. नोकरी, घरातील समस्या सोडवता येतील. उपयोगी खरेदी कराल.

**तूळ** – कुटुंबातील सर्व सदस्यांमध्ये आनंद असेल. साहित्यात प्रगती कराल. महत्त्वाचा निर्णय घेताना ज्येष्ठांचा सल्ला उपयोगी पडेल.

**वृश्चिक** – मुलांप्रतिच्या जबाबदारीची पूर्तता होईल. महत्त्वाचे काम करून घ्या. कामात क्षुल्लक अडचण येऊ शकते. येणे वसूल करा.

**धनु** – आत्मविश्वासात वाढ होईल. धंद्यात योग्य निर्णय घेतला येईल. धरसोड वृत्ती ठेवू नका. एखादे जुने अडकलेले काम पूर्ण होईल.

**मकर** – सरकारी कामात अपेक्षित यश मिळेल. नावडत्या व्यक्तीची भेट होण्याची शक्यता आहे. आपल्या विचारांना चालना मिळेल.

**कुंभ** – मुलांशी संबंधित एखादा महत्त्वाचा निर्णय घ्यावा लागू शकतो. धार्मिक कार्यात खर्च होऊ शकतो. कोर्टकेसमध्ये सौम्यपणे बोला.

**मीन** – नोकरीत आपले वर्चस्व राहील. कुणाच्या नुकसानीस कारणीभूत होऊ नका. मुलांकडून एखादी आनंदाची बातमी मिळेल.

# आतोणे येथे श्री भैरवनाथ जोगेश्वरी उसत्व सोहळा



गोमाशी (आकांक्षा नार्वेकर) : सालाबादप्रमाणे आतोणे येथे श्री भैरवनाथ जोगेश्वरी उसत्व सोहळा ७ व ८ डिसेंबर २०२४ रोजी संपन्न झाला.या सोहळया निमित्त मंदिराची फुलांनी केलेली सजावट आकर्षक होती.

या उत्सव सोहळया निमित्त भैरवनाथ अभिषेक, सत्यनारायण महापूजा, महिलांचा हळदी कुंकु, हरिपाठ, तसेच मुली व महिलांसाठी स्पर्धात्मक कार्यक्रम व रात्री ए व्ही आणि ओम साई डान्स अकॅडमी पाली याच्या वतीने विविध नृत्याविष्कार सादर करून बालकलाकारानी प्रेक्षकांची मने जिंकली.

या उत्सवानिमित्त खेळणी विक्रेते, दुकानदार विक्रीसाठी बसले होते .मंदिर परिसरात भाविकांची गर्दी मोठ्या प्रमाणात होती . तसेच आतोणे ग्रामस्थ अमेरिका, कॅनडा, मुबई, ठाणे येथून या कार्यक्रमासाठी उपस्थितीत होते.खेळीमेळीच्या वातावरणात पालखी सोहळा उत्साहात संपन्न झाला.

# पाणी बिलाची थकबाकी असलेल्या १७८० नळ जोडण्या खंडित

ठाणे : ठाणे महापालिकेची पाणी बिल थकबाकी वसुलीकरता पाणी पुरवठा विभागाने मोठ्या प्रमाणात कारवाई सुरू केली आहे. या मोहिमेत संपूर्ण महापालिका क्षेत्रात आतापर्यंत १७८० नळ जोडण्या खंडित केल्या असून १५२ मोटर पंप जप्त केले आहेत.

तसेच, एकूण ५० पंप रुम सील करण्यात आले असून थकबाकी वसुलीसाठी ३३५४ थकबाकीदार ग्राहकांना नोटीसा पाठवण्यात आल्या आहेत. या पाणी बिल वसुली अभियानात आतापर्यंत सुमारे ५९.४३ कोटी रुपयांची वसुली करण्यात आली आहे.

महापालिकेची पाणी बिल रक्कम सुमारे २२४ कोटी रुपयांच्या घरात आहेत. त्यापैकी, ७६ कोटी रुपये ही थकबाकी असून चालू वर्षाची बिल रक्कम ही १४८ कोटी रुपये आहे. पाणी बिलाची थकबाकी न भरल्यास नळ जोडणी खंडित करून पाणी पुरवठा बंद करण्याची कारवाई सुरू करण्यात



आली आहे. महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी याबाबत स्पष्ट निर्देश दिले आहेत. तसेच, आयुक्तस्तरावर या वसुलीबाबत सातत्याने आढावाही घेतला जात आहे.

अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांनी बिलाच्या साप्ताहिक वसुलीचे लक्ष्य निर्धारित करून पाणी बिल वसुली अभियान सुरू करण्यास सांगितले आहे. त्यानुसार, पाणी बिलाच्या थकबाकीसह वसुलीसाठी महापालिकेच्या सर्व प्रभागात नळ जोडणी खंडीत करणे, मोटर पंप जप्त करणे, मीटर रुम सील करण्यात येत आहेत. तसेच, पाणी बिलाचा भरणा न करता, खंडित नळ जोडणी परस्पर पुन्हा कार्यान्वित करुन घेतल्यास गुन्हे दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

प्रभाग समितीतील पाणी पुरवठा विभागाच्या अभियंत्यांच्या नेतृत्वात पाणी बील वसुलीची मोहीम राबवण्यात येत असून कारवाईत हयगय करू नये, असे त्यांना निर्देश देण्यात आले आहे. नागरिकांनी पाणी बिल वेळेत भरावे, तसेच थकबाकीदारांनी बील भरून पालिकेस सहकार्य करावे. अन्यथा नळ जोडणी खंडित करण्यात येईल, असे उपनगर अभियंता (पाणी पुरवठा) विनोद पवार यांनी स्पष्ट केले आहे.

# भिवंडीतून सहा बांगलादेशी महिलांना अटक ठाणे गुन्हे अन्वेषण शाखेची कारवाई



**ठाणे (सम्यक कासारे) :** बेकायदेशीरपणे भारतात प्रवेश करून भिवंडीमध्ये वास्तव्य करणाऱ्या सहा बांगलादेशी महिलांना ठाणे गुन्हे अन्वेषण शाखेने अटक केली. त्यांच्याविरोधात पारपत्र अधिनियम, परकीय नागरिकांचा कायदा कलमांतर्गत भिवंडी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भिवंडीमध्ये बेकायदेशीरपणे बांगलादेशी महिला वास्तव्यास असल्याची माहिती ठाणे गुन्हे अन्वेषण शाखेच्या अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे, पोलिसांच्या पथकाने हनुमान टेकडी परिसरातून सहा बांगलादेशी महिलांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे चौकशी केली असता, त्यांच्याकडे पारपत्र आढळून आले नाही. या सर्व महिलांनी त्या बेकायदेशीरपणे भारतात आल्याचे कबूल केले. येथील भाड्याच्या घरामध्ये त्या वास्तव्य करत होत्या. या महिलांविरोधात पोलिसांनी भिवंडी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. त्यांच्याविरोधात पारपत्र अधिनियम १९२० चे कलम ३,४, परकीय नागरिकांचा कायदा १९४६ चे कलम १३, १४-अ (ब) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## SPORT

# The Kamlesh Nagarkoti story: Battling injuries, long rehab, fresh start with CSK



**NEW DELHI:** Kamlesh Nagarkoti's career has been riddled with injuries, keeping the right-arm pacer off the cricket field more than on it. A promising talent from India's victorious 2018 Under-19 World Cup squad, Nagarkoti became an IPL sensation that same year when the Kolkata Knight Riders (KKR) bought him for a whopping Rs 3.2 crore after a fierce bidding war.

Nothing went as he would have liked from there on as the seamer, known for consistently clocking 140 plus kmph, was forced to miss the entire season due to a foot injury before the tournament began. The KKR think-tank retained him in 2019 but he remained off-field for another season due to a back injury. When he finally made his IPL debut in 2020, the promising quick played 10 games and managed just 5 wickets. Released by KKR ahead of the IPL 2022 Mega Auction, Nagarkoti was picked up by the Delhi Capitals for Rs 1.1 crore but featured in only one match before a back injury ended his season.

At the recent IPL 2025 mega auction, interest naturally wasn't high for Nagarkoti and Chennai Super Kings (CSK) got his services for a bid of Rs 30 lakh. For a player who has been battling a lot of injury issues for last six years, it was the end of a very long wait. "I have been waiting for this for a long time. I am grateful that I have got an opportunity once again. I am back again where I always wanted to be. I am eager to join CSK, and that's because of Mahendra Singh Dhoni sir.

# 'Can A 13-Year-Old Hit Such A Long Six?': Former Pakistan Pacer Questions Vaibhav Suryavanshi's Age

**New Delhi -** Recently becoming the youngest ever player to be picked at an IPL auction, Vaibhav Suryavanshi recently represented an India U19 team at the Asia Cup 2024 in UAE where his team finished as the runners-up. Suryavanshi was picked by Rajasthan Royals at the mega auction for Rs 1.1 crore in Jeddah.

At the U19 Asia Cup, after a quiet start, Suryavanshi showed his wares with back-to-back blistering half-centuries that propelled India into the final. Against UAE, he the 13-year-old opener belted an unbeaten 76 off 46 with three fours and six sixes. And then in the semifinal against Sri Lanka, he led India's successful chase of 174 with a 36-ball 67 during which he struck six fours and five sixes.

Former Pakistan fast bowler Junaid Khan is in disbelief at the long sixes that Suryavanshi blasted against Sri Lanka in Sharjah insinuating if 13 is his real age.



"Can a 13-year-old kid really hit such a long six????" Junaid wrote on Instagram while sharing a clip of a six Suryavanshi off Sri Lankan pacer Dulnith Sigera as the ball landed deep into the stands.

Recently, Suryavanshi's father Sanjeev brushed aside the age controversy and said his son can undergo bone test if needed.

"When he was 8 and half years old he first appeared for a BCCI bone test. He has already played India U-19. We don't fear anyone.

Suryavanshi represents Bihar in domestic cricket and has played five first-class matches in addition to a T20. Earlier in September, he scored a century against Australia aged 13 years and 187 days which made him the youngest ever to do so in youth cricket.

Sanjeev told News18 that growing up, they faced financial challenges.

"We faced many difficulties, which also included a financial crisis. When Vaibhav was five years old, I used to make him practice cricket at our doorstep. At the age of 7, Vaibhav was enrolled in Samastipur Sports Academy.

# 'I wonder if Andy Murray can contribute to Novak Djokovic's game': Rublev questions Serbian's coaching decision

**New Delhi -** Aiming to bounce back to form in 2025, Novak Djokovic appointed Andy Murray as his coach in November this year. Murray, who announced his retirement earlier this year, will be on court with Djokovic from the 2025 Australian Open.

The decision was bombshell news for tennis fans, experts and players. World No. 8 Andrey Rublev also joined the bandwagon and he revealed that he was left confused by the announcement as he didn't see how it could benefit Djokovic. But Rublev also felt that their friendship could be beneficial to Djokovic during the season.



"Novak is one of the most accomplished players in history. In that way, I wonder if Andy can contribute to his game and add new elements. On the other hand, they are good friends, which benefits their collaboration. We must remember that positive energy sometimes gives much more at this level than anything else. Novak knows tennis better than everyone, and he can feel fresh and motivated with Andy in his box. It will be interesting to see Andy's reactions when Novak gets too emotional and throws bad words at his team," said Rublev.

Djokovic and Murray met 36 times, with the Serbian ace leading 25-11 overall and 11-8 in finals. Ten of their face-offs have been in majors, with Djokovic leading 8-2. They are also one of the two male pairs to have contested the finals of each of the four majors (Djokovic-Nadal is the other).

Meanwhile, the Serbian leads 20-8 on hard courts and 5-1 on clay. Murray won their two matches played on grass.

The duo are almost of the same age, with Murray being a week older. They went to training camp together and as juniors, Murray won the first fixture they played against each other.

# 'Bumrah may get more wickets but Shami India's best bowler, Siraj nowhere near him: West Indies legend Andy Roberts

**New Delhi -** Legendary West Indies cricketer Andy Roberts heaped praise on Mohammed Shami, calling him "India's best bowler." Roberts, a daunting member of the famous West Indies pace quartet - Michael Holding, Joel Garner, and Colin Croft being the others - that terrorised batters across the globe in the 1970s and 80s, said Jasprit Bumrah might get more wickets but Shami is the complete package who has more control and can seam and swing the ball both ways.

"Shami has been India's best bowler for a while. He may not get the amount of wickets Jasprit Bumrah gets, but he's the full package and is more consistent than the rest. Shami swings the ball, Shami seams the ball and Shami's control is as good as Bumrah's," Roberts told Mid-day.

Roberts, who picked up 202 wickets in 47 Tests at an average of 25.61, said Mohammed Siraj, India's second-best seamer after Bumrah in Australia, is nowhere near Shami's class. Shami should play. Mohammed Siraj is nowhere near Shami," Roberts added.



**When will Shami go to Australia?**

Roberts' comments come at a time when Shami's availability for the remainder of the Border-Gavaskar Trophy is still in doubt. The veteran of 64 Tests has not played for India since the ODI World Cup in November last year. His last Test match was also against Australia in the WTC final in June last year.

After recovering from a long injury layoff, Shami has looked in fine form for Bengal in the solitary Ranji trophy match and T20s that he has played. After playing a major role in taking Bengal to the knockouts, picking up 8 wickets in seven matches at a 7.67 economy, Shami played a match-winning hand with both bat and ball against Chandigarh to take them to the quarterfinals. Shami scored an invaluable 17-ball-32 and bowled 13 dot balls in his four overs.

Despite Shami giving a good account of himself in the Syed Mushtaq Ali matches, the NCA is yet to give him a green signal for the Australia Tests. After India lost the second Test in Adelaide, captain Rohit Sharma said "doors are always open for Shami" but has developed a new swelling on his knee that the medical team is monitoring.

The five-match Border-Gavaskar Trophy currently stands 1-1. The third Test at the Gabba in Brisbane is slated to begin on Saturday. It is safe to say that there is no chance of Shami being available for that match, but the possibility of seeing him in action for the Boxing Day Test in Melbourne cannot be ruled out.

# कुर्ला बेस्ट बस अपघातातील मृतांची संख्या वाढली

## आतापर्यंत ७ मृत्यू तर ४९ जखमी

● मुंबई, विशाल कारंडे :

मुंबईच्या एलबीएस रोडवर कुर्ला परिसरात सोमवारी रात्री बेस्ट बसचा भीषण अपघात झाला होता. बेस्ट बस कुर्ला येथील गजबजलेल्या परिसरातून जात असताना चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटले आणि बस थेट गर्दीत शिरली. या अपघातात अनेकजण चिरडले गेले. बेस्ट बसचा ब्रेक फेल झाल्यामुळे हा अपघात झाल्याचे सांगितले जात आहे. या अपघातात आतापर्यंत एकूण ७ जणांचा मृत्यू झाल असून मृतांचा आकडा वाढण्याची भीती आहे. या घटनेमुळे मुंबईत एकच खळबळ उडाली असून बेस्ट प्रशासन आणि कंत्राटी कर्मचारी याबाबत अनेक प्रश्न नव्याने ऐरणीवर आले आहेत.



दरम्यान, कालच्या दुर्घटनेत बेस्ट बसमुळे चिरडल्या जाणाऱ्यांमध्ये आफरिन शहा या १९ वर्षीय तरुणीचा समावेश आहे. आफरिन हिचा सोमवारी नोकरीचा पहिला दिवस होता. ती कामावरुन घरी परतत असताना बेस्टच्या धडकेत तिचा मृत्यू झाला. तर कनीज फातिमा या महिलेचाही अपघातात मृत्यू झाला. त्या एका रुग्णालयात नोकरी करायच्या. काल अपघात घडला तेव्हा फातिमा या रुग्णालयात नाईट ड्युटीसाठी निघाल्या होत्या. ही सगळी माहिती समोर आल्यानंतर नागरिकांकडून हळहळ व्यक्त केली जात आहे.

कुर्ला घटनेतील बस जर सदोष असेल तर त्या कंपनीवर गुन्हा दाखल केला पाहिजे अशी आमची मागणी आहे. सहापेक्षा जास्त लोक मृत्यूमुखी पडले आहेत. मृतांच्या कुटुंबीयांना ५ लाख रुपये मदत सरकारने केली आहे. राज्यात आशा घटना घडू नये यासाठी आमचा प्रयत्न आहे. कंत्राटी किंवा अर्ध शिक्षित व्यक्तीला बस चालवायला कोणी दिली. त्या व्यक्तीवर कारवाई झाली पाहिजे. सदोष वाहन तयार करणे हे हा गुन्हा आहे. आपण कोणत्याही कंपनीचा उल्लेख करणं योग्य नाही. दोषपूर्ण वाहन तयार केल असेल तर चुकीच आहे. संबंधित कंपनीला सहआरोपी करावं. कंपनीचा मालक कोणीही असला तरी कारवाई झाली पाहिजे, असे चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले.

### 5 लाखांची आर्थिक मदत -

“ या घटनेतील मृतांच्या वारसांना मुख्यमंत्री सहायता निधीतून ५ लाख रुपये आर्थिक मदत देण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले आहे. या घटनेत जे जखमी झाले, त्यांच्या उपचाराचा खर्च मुंबई महापालिका आणि बेस्टच्या वतीने करण्यासाठी आदेश देण्यात आले आहेत, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले आहे.

### अपघातामध्ये मृत्युमुखी पडलेल्यांची नावे

- कनीज अन्सारी (वय ५५)
- आफरिन शहा (वय १९)
- अनम शेख (वय २०)
- शिवसम कश्यप (वय १८)
- विजय गायकवाड (वय७०)
- फारुख चौधरी (वय ५४)
- कनीज़ फातिमा

### बेस्ट बस तयार करणाऱ्या कंपनीवर कारवाई होणार?

“ कुर्ला बस अपघातानंतर संबंधित बेस्ट बसमध्ये तांत्रिक बिघाड होता का, अशी चर्चा सुरु झाली आहे. बेस्ट प्रशासनाने बसमध्ये तांत्रिक बिघाड असल्याचा दावा फेटाळून लावला आहे. मात्र, याबाबत भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना बस तयार करणाऱ्या कंपनीवर कारवाई करण्याचे संकेत दिले आहेत.

### प्रत्यक्षदर्शी काय म्हणाले?

“ या दुर्घटनेनंतर घटनास्थळी उपस्थित असलेल्या नागरिकांनी या भयानक घटनेबाबत माहिती दिली. प्रत्यक्षदर्शी कपिल सिंग यांनी सांगितले की, कुर्ला ते अंधेरी रेल्वे स्थानकादरम्यान धावणारी मार्ग क्रमांक ३३२ ची बेस्ट बस पूर्णपणे भरली होती. बसने प्रथम ऑटोरिक्षाला धडक दिली आणि नंतर एकामागून एक वाहनांना धडक दिली आणि आंबेडकर कॉलनी गेटवर धडकल्यानंतर ही बस थांबली. या घटनेत बसने अनेक पादचारी आणि फेरीवाल्यांना धडक दिली. नेमकं काय घडतंय हे कळण्याच्या आता हे सारं घडलं. लोकांना धक्का बसला होता. ते एखाद्या दहशतवादी हल्ल्यासारखं दिसत होतं. संतप्त जमावाने बसचा पाठलाग करून चालकाला पकडले आणि पोलिस येईपर्यंत त्याला बेदम मारहाण केली, असे कपिल सिंग यांनी सांगितले.

# बाबा सिद्दिकींच्या हत्येपूर्वी अनमोल बिश्नोई कोणाशी बोलला होता?



● मुंबई, यश सावंत :

## एफबी पोस्टमधून मोठा खुलासा

अजित पवार गटाचे नेते बाबा सिद्दिकी यांच्या हत्या प्रकरणाचा तपास करणाऱ्या मुंबई गुन्हे शाखेने मोठा खुलासा केला आहे. बाबा सिद्दिकी यांच्या हत्येनंतर लॉरेन्स बिश्नोई गँगच्या प्लॅनचा मुख्य सूत्रधार शुभम लोणकर याने फेसबुक पोस्टद्वारे याची जबाबदारी स्वीकारली. ही हत्या करण्यापूर्वी अनमोल बिश्नोई आणि इतर काही गुंडांनी शुभमशी बोलून घटनेनंतर जबाबदारी घेण्याचे आदेश दिले होते. सिद्दिकी यांच्या हत्येनंतर प्लॅननुसार सर्वप्रथम शुभमच्या नावाने फेसबुक प्रोफाईल तयार करण्यात आलं, त्यानंतर त्यावर पोस्ट टाकून हत्येची जबाबदारी स्वीकारण्यात आली. यानंतर, प्रोफाईलचा स्क्रीनशॉट काढून ते प्रोफाईल डिलीट करण्यात आलं. सूत्रांनी सांगितलं की प्लॅनचा एक भाग म्हणून, स्क्रीनशॉट दिल्लीतून पब्लिक डोमेनमध्ये व्हायरल केला गेला. गुन्हे शाखेच्या एका अधिकाऱ्याने सांगितलं की, फेसबुक प्रोफाईल डिलीट केल्यामुळे त्याची URL कळू शकली नाही. फेसबुकशी संपर्क साधूनही त्यामुळे जबाबदारी स्वीकारणारी पोस्ट कुठून आली याचा कोणताही पुरावा मिळू शकला नाही. गुन्हे शाखेच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, बाबा सिद्दिकी यांच्या हत्येपूर्वी अनमोलने शुभमशी संपर्क साधल्याचे पुरावे मिळाले आहेत. अनमोल बिश्नोईने शुभम लोणकर आणि मुख्य शूटर शिवकुमार गौतमच नाही तर या प्रकरणातील अन्य अनेक आरोपी रुपेश मोहोळ (प्लॅन बीचा शूटर), नितीन सप्रे (शस्त्रे पुरविणाऱ्या गँगचा प्रमुख) यांचीही भेट घेतल्याचं तपासात समोर आलं आहे गौरव अपुने (प्लॅन बी चा दुसरा शूटर) आणि सुजित सिंब यांच्याशी अनेकदा बोललो।

एका अधिकाऱ्याने सांगितलं की, हे संभाषण बाबा सिद्दिकी यांच्या हत्येपूर्वी झाले होते. या संवादादरम्यान अनमोल बिश्नोईने प्रत्येक वेळी त्यांना प्रवृत्त करण्याचे, मोठी रक्कम मिळवून देण्याचे आणि त्यांना सुरक्षितपणे परदेशात स्थलांतरित करण्याचे आश्वासन दिले होते. गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, या आरोपींच्या फोनमधून अनेक महत्त्वाचे पुरावे सापडले असून त्यात अनमोलशी बोलल्याचा पुरावा आहे. एवढेच नाही तर या आरोपींनी चौकशीत याची कबुलीही दिली आहे.

# बाळाला रस्त्यावर फेकलं, रडण्याचा आवाज येऊ नये म्हणून तोंडाला बांधली पिशवी

● पुणे, शकील शेख :

पुण्यामध्ये नवजात बाळाला रस्त्यावर सोडून दिल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. पुण्याच्या वडगाव बुद्रुकमध्ये ही घटना घडली आहे. धक्कादायक बाब म्हणजे बाळाचा रडण्याचा आवाज येऊ नये यासाठी त्याच्या तोंडाला पिशवी बंधण्यात आली होती. स्थानिक नागरिकांना बाळाच्या रडण्याचा आवाज आला. त्यांनी बाळाला ताब्यात घेऊन पोलिसांकडे दिले. या घटनेमुळे पुण्यात खळबळ उडाली आहे. पोलिस बाळाच्या आई-वडिलांचा शोध घेत आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, पुण्यात नवजात बालकाला जन्म देवून रस्त्यावर सोडून देण्यात आले. पुण्यातील वडगाव बुद्रुक परिसरातील रेणुका नगरीमधील ही घटना आहे. नवजात बाळाला रस्त्याच्या कडेला सोडून देण्यात आले होते. रडण्याचा आवाज येऊ नये म्हणून नवजात बाळाच्या तोंडावर प्लास्टिकची पिशवी बांधण्यात आली होती.

सोमवारी रात्री बाळाचा रडण्याचा आवाज ऐकून आजूबाजूच्या लोकांनी घटनास्थळी धाव घेतली. तर त्यांना बाळ रस्त्याच्या कडेला सापडले. नागरिकांनी तात्काळ सिंहगड पोलिसांना संपर्क केला. सिंहगड पोलिसांनी नवजात बाळाला तातडीने ससून रुग्णालयात दाखल केले. बालकाची प्रकृती स्थिर आहे.

# रिलायन्स नागोठणे कंपनी विरोधात शेतकऱ्यांचे आमरण उपोषण

● पाली, भावना जैन :

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड नागोठणे कंपनी च्या संलग्न बेणसे झोतिरपाडा ग्रामपंचायत हद्दीत नवीन प्रकल्पाची उभारणी होत आहे. मात्र स्थानिक, शेतकरी,भूमिपुत्रांच्या प्रश्न व तक्रारींकडे सुरवातीपासून जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून यंत्रणांना हाताशी धरून मुस्कटदाबी व प्रचंड अन्यायकारक धोरण राबविले जात असल्याचा आरोप योगेश अडसुळे व इतर शेतकरी करीत आहेत.आपली पिढ्यानपिढ्या असलेली मालकी हक्काची शेतजमीन वाचविण्यासाठी व आपल्या कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी योगेश अडसुळे व अन्य शेतकऱ्यांनी दंड थोपटले आहेत.



योगेश अडसुळे हे बुधवार दि. (११) डिसेंबर आज पासून बेणसे सिद्धार्थ नगर आमरण उपोषणास बसणार आहेत.

रिलायन्स नागोठणे कंपनीच्या मनमानी कारभारा विरोधात बेणसे सिद्धार्थ नगर व विभागातील शेतकरी चांगलेच आक्रमक झाले आहेत. येथील पाईपलाईन बाधित शेतकऱ्यांनी रायगड जिल्हाधिकाऱ्यांना व इतर प्रशासन स्थरावर तक्रारी निवेदन दिले आहेत. त्यामुळे येत्या काळात हे आंदोलन अधिक पेटण्याची चिन्ह दिसू लागली आहेत. स्थानिकांच्या मागण्या व शेतकऱ्यांचे प्रलंबित प्रश्न सोडवले जावेत यासाठी रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी , डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे नातू आनंदराज आंबेडकर, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले )चे रायगड जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड व पदाधिकारी, ऑल इंडिया पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दिपकभाई केदार, वंचित बहुजन आघाडीचे नेते व प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते , बौद्ध समाज युवा संघाचे पदाधिकारी, बहुजन विद्यार्थी संघटनेचे नेते व पदाधिकारी तसेच विविध शेतकरी संघटनांचे पदाधिकारी यावेळी उपस्थित राहणार असल्याचे सांगण्यात आले.

# बालकांवरील लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत (पोक्सो) 35 प्रकरणांवर सुनावणी

● मुंबई, राकेश गायकवाड :





महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाद्वारा वरळी येथे लैंगिक गुन्ह्यापासून बालकांचे संरक्षण कायदा अन्वये तसेच बालकांचे मोफत व सक्तीचे शिक्षण हक्क अन्वये, आयोगाकडे प्राप्त तक्रारीबाबत बालकांवरील लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत (पोक्सो) ३५ प्रकरणांवर सुनावणी घेण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने पोक्सो कायद्यांअंतर्गत प्राप्त तक्रारींचा समावेश होता.यावेळी मुंबई शहर व उपनगर परिसरातील संबंधित पोलीस स्थानकातील वरिष्ठ पोलीस अधिकारी, बाल कल्याण समिती, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी उपस्थित होते. तसेच शिक्षण विभागाशी संबंधित अधिकारी व शाळांचे प्रतिनिधी उपस्थित होते.सुनावणीसाठी असणाऱ्या जवळपास सर्वच प्रकरणात पोलिसांनी वेळेत दोषारोप पत्र दाखल केले होते. याबाबत आयोगाने पोलिसांचे कौतुक केले. ही प्रकरणे सदयस्थितीत न्यायालयात प्रलंबित आहेत. तसेच बऱ्याच प्रकरणांमध्ये तक्रारदारांनी गैरहेतूने खोट्या तक्रारी दाखल केल्याचे आयोगाच्या निदर्शनास आले. यावर उपाय म्हणून आयोग लवकरच मार्गदर्शक सूचना व शिफारशी जारी करणार आहेत, यामुळे कायद्याचा गैरवापर करणाऱ्यांवर वचक बसेल आणि वेळ वाया जाणार नाही. महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्ष ॲड. सुशीबेन शाह, आयोगाचे सदस्य ॲड. श्री. संजय सेंगर, ॲड. निलिमा चव्हाण, सायली पालखेडकर, ॲड. प्रज्ञा खोसरे यांच्या उपस्थितीत ही सुनावणी झाली. या सुनावणीमध्ये प्रामुख्याने पोक्स कायद्याअंतर्गत तक्रार प्रकरणांचा समावेश असल्याने विशेष पोलीस निरीक्षक, महिला व बाल अत्याचार प्रतिबंध विभाग, मुंबई या कार्यालयाच्या वतीने पोलीस उपअधीक्षक, सारा अभ्यंकर या उपस्थित होत्या.

# वैध मापन शास्त्र यंत्रणेकडून ठाणे जिल्ह्यात जानेवारी ते नोव्हेंबर २०२४ कालावधीत ४०० खटले दाखल

● ठाणे, रोहित जैसवाल :

वैध मापनशास्त्र अधिनियम २००९ व त्या अंतर्गत नियमातील तरतुदींचे उल्लंघन केल्याप्रकरणी ठाणे वैधमापन शास्त्र यंत्रणेने जिल्ह्यातील विविध औद्योगिक आस्थापना, व्यापारी, दुकानदारांवर जानेवारी २०२४ ते नोव्हेंबर २०२४ या कालावधीत सुमारे ४०० खटले दाखल केले असून दंडापोटी एकूण 58 लाख ३२ हजार इतकी रक्कम शासन जमा करण्यात आले असल्याची माहिती वैधमापन शास्त्र यंत्रणा ठाणे (१)चे उपनियंत्रक रा. फ. राठोड यांनी दिली आहे.

वैध मापनशास्त्र यंत्रणेची जिल्हा स्तरीय ठाणे जिल्हा क्र.१ व ठाणे जिल्हा क्र.२ अशी दोन जिल्हे आहेत. वैध मापनशास्त्र यंत्रणेव्दारे वैध मापनशास्त्र अधिनियम २००९ व त्या अंतर्गत नियमातील तरतुदींची अंमलबजावणी केली जाते. या कायद्यांतर्गत प्रामुख्याने व्यापारी व औद्योगिक आस्थापनाकडे वापरात असलेली वजने मापे यांची नियतकालीक पडताळणी व मुद्रांकन करणे व आवेष्टित (पॅकबंद) वस्तूवर नियमानुसार उद्घोषणा असणे आवश्यक आहे. आवेष्टित वस्तूवर उत्पादकाचा पूर्ण नाव व पत्ता, वस्तूंचे नाव, वस्तूंचे निव्वळ वजन/माप, उत्पादन तारीख, कमाल विक्री किंमत (सर्व करांसहित), एकल विक्री किंमत (Unit Sale Price), ग्राहक तक्रार निवारण क्रमांक व ई-मेल पत्ता इ. उद्घोषणा लिहिणे कायद्याने बंधनकारक आहे. तसेच छापिल किंमतीपेक्षा जास्त दराने विक्री, किंमतीत खाडाखोड करणे व वस्तू वजन मापात कमी देणे, अप्रमाणित वजने व मापे वापर करणे इत्यादी बाबी कायद्यानुसार गुन्हा ठरतात.

औद्योगिक आस्थापना, व्यापारी, दुकानदार यांच्याकडे वापरात असलेले वजने मापे यांची विहित मुदतीत पडताळणी व मुद्रांकन न करणे, वजन मापात वस्तू कमी देणे, आवेष्टित वस्तुंवर नियमानुसार घोषवाक्य नसणे, आवेष्टित वस्तूंची छापिल किंमतीपेक्षा जास्त दराने विक्री करणे, किंमतीत खाडाखोड करणे, इ. कारणांमुळे कायद्याच्या उल्लंघनाबाबत विविध आस्थापनांविरूद्ध माहे जानेवारी २०२४ ते नोव्हेंबर २०२४ या कालावधीत एकूण ४०० खटले नोंदविण्यात आले असून दंडापोटी एकूण रू.५८ लाख ३२ हजार एवढी रक्कम शासन जमा करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे जानेवारी २०२४ ते नोव्हेंबर २०२४ या कालावधीत वजने मापे पडताळणी व मुद्रांकनपोटी एकूण शुल्क रु. ४ कोटी १६ लाख ८८ हजार ५७१ एवढी रक्कम शासन जमा करण्यात आली असल्याचे श्री. राठोड यांनी कळविले आहे.

मापात पाप केले तर काय कारवाई होवू शकते?

औद्योगिक आस्थापना, व्यापारी, दुकानदार यांच्याकडे वापरात असलेले वजने मापे यांची विहित मुदतीत पडताळणी व मुद्रांकन न करणे, वजन मापात वस्तू कमी देणे, आवेष्टित वस्तुंवर नियमानुसार घोषवाक्य नसणे, आवेष्टित वस्तूंची छापिल किंमतीपेक्षा जास्त दराने विक्री करणे, किंमतीत खाडाखोड करणे, इ. कारणांमुळे वैध मापनशास्त्र अधिनियम २००९ व त्याअंतर्गत नियमातील तरतुदींचे उल्लंघन झाल्यास संबंधित आस्थापनेविरूध्द कारवाई केली जाते. वरीलप्रमाणे कारवाईच्या अनुषंगाने कायद्यातील विविध कलमाच्या भंगामुळे रू.२०००/- ते रू.२५,०००/- पर्यंत दंडाची तरतूद आहे.

फसवणूक झाल्यास इथे करा तक्रार

या कार्यालयाकडे जानेवारी ते नोव्हेंबर २०२४ या कालावधीत एकूण ११४ तक्रारी प्राप्त झालेल्या असून त्याची दखल या कार्यालयाने घेतलेली आहे. या विभागाशी संबंधित कायदा व नियमाचे उल्लंघन होत आहे अथवा तशी शंका असेल तर या विभागाच्या नियंत्रण कक्ष दूरध्वनी क्रमांकावर (ग्राहक तक्रार दूरध्वनी क्र. ०२२-२२६२२०२२ व ईमेल dclm-ms_complaint@yahoo.com) संपर्क साधता येवू शकतो किंवा या कार्यालयाकडे देखील संपर्क करता येईल.

आठवडी बाजारात दगड, फरशीच्या तुकड्याचा उपयोग होत असल्यास, आठवडा बाजाराचा तपशिल किंवा भाजी मंडईचे ठिकाण संबंधित स्थानिक निरीक्षक, जिल्ह्याचे उपनियंत्रक, सह नियंत्रक अथवा मा. नियंत्रक कार्यालयास तसेच जागो ग्राहक जागो यांच्या संकेतस्थळावर (NCH) टोल फ्री किंवा दूरध्वनी क्र. १८००-११-४०००१ किंवा १४४०४ वर, ईमेलव्दारे किंवा पत्राव्दारे, व्हॉटसअप क्रमांकावर आपणास तक्रार दाखल करता येईल. ग्राहकांच्या तक्रारीची ७ दिवसांच्या आत दखल घेवून तक्रारदारास कळविण्यात येते, असेही त्यांनी सांगितले.